# संपादकीय

## ग्रंथसंस्कृतीची उपासना अपरिहार्य

पुण्यात गेल्या महिन्यात क्रॉसवर्ड हे नवे पुस्तकांचे दुकान निघाले. आकर्षक रचना, भरपूर जागा, उत्तम मांडणी, पुस्तके चाळण्याची सोय यामुळे ते एकदम आपल्याला आकृष्ट करते. वर्ड, बुकलँड, मॅनीज, इंटरनॅशनल बुक सर्व्हिस ही देखील पुण्यातील नावाजलेली पुस्तक विक्रीकेंद्रे आहेत. लोक पुस्तके वाचत नाहीत; पुस्तके खपत नाहीत अशी आपली कायमची तक्रार असते. तरीही आज पूर्वी कधीही निघत नव्हती, इतकी प्रचंड संख्येने नवनवी पुस्तके प्रकाशित होत आहेत. मराठीत दर महिन्याला किमान शंभर ते सव्वाशे नवी प्रकाशने प्रसिद्ध होतात. तशात सध्या डीटीपीच्या सुविधेमुळे लेखकानेच पुस्तक प्रकाशित करण्याची एक नवी लाटच उसळली आहे. व्यावसायिक प्रकाशक पुस्तके स्वीकारताना काळजी घेतात; त्यांचे संपादन करतात; प्रसंगी पुनर्लेखनाला प्रवृत्त करतात. परंतु स्वतःच पुस्तक काढायचे म्हटले की या सर्व बाबींकडे सहजपणे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे स्वयं-प्रकाशकांची संख्या वाढत असली तरी पुस्तकांच्या निर्मितीची किमान पथ्येही पाळली जात नाहीत. हे सांगण्याचा उद्देश एवढाच की डीटीपीमुळे प्रकाशनसंस्थांच्या मिरासदारीला थोडेसे आव्हान मिळाले आहे. भारतातील सर्व भाषांचा विचार केला तर वर्षाला किमान वीस हजार पुस्तके प्रकाशित होतात. अमेरिकेत वर्षाला एक लाखावर नवीन पुस्तके बाजारात येतात. म्हणजे तेथे रोज पावणेतीनशे नवी पुस्तके असे प्रमाण पडते. इंग्लिशभाषक देशांचा विचार केला तर अमेरिकेच्या दुप्पट पुस्तके सहज प्रकाशित होत असतील असा अंदाज व्यक्त करता येतो. इतर भाषांमधील पुस्तकांची गणती अलगच!

पुस्तकांची ही संख्या आणि आकर्षक सजावट केलेली पुस्तकांची दुकाने यांजकडे पाहिले तर पुस्तके खपत नाहीत किंवा पुस्तके वाचली जात नाहीत असे कसे म्हणता येईल? कोणी तसे म्हणतो तेव्हा त्यावर कसा विश्वास ठेवता येईल?

दूरदर्शनमुळे लोक आता पुस्तके हातात धरत नाहीत; ते दूरदर्शनवरचे कार्यक्रम बघत राहतात. इतर करमणुकीच्या कार्यक्रमात रमतात. असेही आपण म्हणतो. पण तरीही पुस्तकांची संख्या कमी झालेली नाही. पुस्तके निघतच आहेत. वाचणारे वाचत आहेत. आपण वाचतो की नाही, वाचली तर कुठली पुस्तके वाचतो, किती पुस्तके वाचतो, कशासाठी आपण पुस्तके वाचतो असे प्रश्नही विचारता येतील.

त्याचबरोबर हेही लक्षात घ्या की एनिड ब्लायटन या बालसाहित्य लिहिणाऱ्या लेखिकेच्या ७०० पुस्तकांच्या वर्षाला एक कोटीवर प्रती विकतात. रहस्यकथा लेखिका अ‍ॅगाथा ख्रिस्ती हिच्या मृत्यूला वीस वर्षे होतील. पण आजही दरवर्षी तिच्या पुस्तकांच्या प्रती तिच्या हयातीत खपल्या होत्या, त्याच्या शेकडो पटींनी खपत आहेत. गेल्या वीस वर्षात तिची दोनशे कोटी पुस्तके खपली आहेत असे प्रसिद्ध झाले आहे. बार्बरा कार्टलँड ही लेखिका ९४ वर्षांची आहे. तिच्या सहाशे प्रेमकथांची दरवर्षी विक्री अशीच भरपूर दीड कोटी प्रतींपेक्षा जास्त होते. व्हिक्टोरिया होल्ट ही लेखिका केवळ त्रिकोणी प्रेमकथा लिहिते. तिच्या पुस्तकांच्या वीस कोटी प्रती खपल्या आहेत. स्टिफन किंग, टॉम क्लॅन्सी, डॉनिएल स्टील, जॅफ्रे आर्चर, हॅरॉल्ड रॉबिन्स, इत्यादी बेस्ट सेलर लेखक म्हणजे एकेका पुस्तकाच्या दहा वीस लाख प्रतींची वर्षभरात विक्री असे समीकरणच बनले आहे. आता तुम्ही म्हणाल, हे सर्व इंग्लंड-अमेरिकेत आहे. भारतात काय दिसते? गीता प्रेसची भगवद्‌गीता घ्या - आजवर तिच्याही कोटीच्या जवळपास प्रती विकल्या गेल्या आहेत. बायबल हेही जगातले सर्वात जास्त विकले जाणारे पुस्तक आहे.

परवा अत्रे सभागृहात एका ग्रंथप्रदर्शनाला गेलो होतो. चातुर्मासानिमित्त धार्मिक पुस्तकांचीच त्यात बहुतांशी मांडणी केलेली होती. मराठीत हजारो धार्मिक पुस्तके आहेत - हे तेव्हा लक्षात आले. कोणताही विषय घ्या - त्यावर तेथे ग्रंथ होताच. वेद, उपनिषदे, पुराणे, रामायण, महाभारत, गीता, पतंजली योगसूत्रे, संतांच्या गाथा, संतांची चरित्रे, तंत्रमंत्र, ज्योतिष, ज्ञानेश्वरी, दासबोध, तुकाराम, एकनाथ, गुरुचरित्र, धर्मशास्त्र, पोथ्या, भक्त विजय, हरिविजय, रजनीश मेहेरबाबा, गुरुदेव रानडे, बेलसरे इ. किती नावे सांगावी? भगवत् गीतेच्या तर वेगवेगळ्या आवृत्त्या. अगदी मुठीत मावेल इथपासून ऐश्वर्यवती विशाल प्रतीपर्यंत. धार्मिकच नव्हे इतरही विषयांवरची पुस्तके आता भरपूर दिसतात. भारतात इंग्रजी पुस्तके ही भारतीय भाषांतील पुस्तकांपेक्षाही जास्त खपतात.

भारतीय भाषांच्या मर्यादेमुळे प्रादेशिक भाषांतील पुस्तके कमी खपतात असे फार तर म्हणता येईल. ती अधिक खपायला हवी असेही म्हणता येईल. परंतु दूरदर्शन वा अन्य इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी छापील पुस्तक हा प्रकारच काल विसंगत ठरवला आहे असे आजतरी दिसत नाही.

पुस्तके म्हणजे ज्ञान. पुस्तके म्हणजे रंजन. पुस्तके म्हणजे संवाद.

ज्ञानाशिवाय प्रगती अशक्य. जगणे अशक्य.


संवादाशिवाय इतरांशी संपर्क अशक्य. समाजजीवनच असंभाव्य.

रंजनाशिवाय जीवन बेचव-अळणी होईल.

त्यामुळेच पुस्तके खपत नाहीत, पुस्तके वाचली जात नाहीत, पुस्तके महाग होत आहेत वगैरे विधाने करून आपण स्वत:ला वाचनापासून परावृत्त करण्याच्या मोहात अडकू नका.

पुस्तके ही आपल्या जीवनात आवश्यक आहेत; त्यांच्या माध्यमातून मिळणारे ज्ञान आपल्याला नव्या श्रीमंतीसमृद्धीकडे नेणार आहे या श्रद्धेने पुस्तकांकडे पहा. पाश्चात्य देशातले लोक पुस्तकांकडे इतक्या आत्मीयतेने पाहतात; म्हणून एवढी प्रगती करून आज जगावर वर्चस्व गाजवतात. हे वर्चस्व ज्ञानाच्या बळावर ते गाजवतात. गेल्या सहाशे वर्षांच्या ग्रंथसंस्कृतीच्या अभंग उपासनेच्या बळावर ते हे वर्चस्व गाजवतात याचा विसर पडू देऊ नका. भारतात ग्रंथप्रामाण्याच्या नावावर त्याच त्या पुस्तकांची पारायणे होत राहिली; पाश्चात्य जगात जे काही नवे ज्ञान होईल ते ग्रंथरूपात मांडण्याची परंपरा निर्माण झाली. त्या ज्ञानाच्या आधारे नवीन ज्ञान मिळवण्याची, नवे संशोधन करण्याची परंपरा निर्माण झाली. ती अखंड चालू राहिली. तिच्या रूपाने नव्या ज्ञानाचे नेमके उपयोजन सुरू झाले. त्यातून नवे शोध लागले.

–या प्रक्रियेचा भारतात आरंभ व्हायचा असेल तर ग्रंथसंस्कृतीची उपासना आवश्यक आहे. आपल्या दैनंदिन जीवनातला पुस्तके हा एक आवश्यक भाग बनायला हवा.



संपादक



# साहित्य वार्ता

## 'वासुदेवी टीका'चे हस्तलिखित उपलब्ध

संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि समर्थ रामदास या संतत्रयींशी नाते सांगणारी 'वासुदेवी टीका' ही अभंगरचना हस्तलिखित स्वरूपात उपलब्ध झाली आहे. वारकरी व रामदासी अशा दोन संप्रदायांशी एकाच वेळी नाते जोडणारी ही रचना असल्याने या हस्तलिखिताला विशेष महत्त्व आहे.

अनेक दृष्टींनी महत्त्वाची असलेली ही रचना संतसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. भा. पं. बहिरट यांना आवडली. त्यांनी ही रचना प्रकाशित केली जावी, असे सुचविले. आता पुणे विद्यापीठाच्या संत ज्ञानदेव अध्यासनाने त्याच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली आहे. अध्यासन प्रमुख डॉ. सदानंद मोरे, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे ग्रंथपाल वा. ल. मंजूळ व संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. र. रा. गोसावी हे संपादन करीत आहेत. प्रकाशनासाठी अंदाजे पन्नास हजार रुपये खर्च येणार असून, अध्यासनातर्फे पंधरा हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. अन्य रक्कम देणगी स्वरूपात जमवण्यात येणार आहे.

## लक्ष्मीकांत देशमुख यांच्या 'उदक'ला ठोकळ पुरस्कार

महाराष्ट्र साहित्य परिषदेचा उत्कृष्ट ग्रामीण साहित्यासाठी दिला जाणारा ग.ल. ठोकळ पुरस्कार यावर्षी लक्ष्मीकांत देशमुख यांच्या 'उदक' या कथासंग्रहाला डॉ. आनंद यादव यांच्या हस्ते देण्यात आला. लक्ष्मीकांत देशमुख हे औरंगाबादला पुरवठा अधिकारी आहेत. परभणी साहित्य संमेलनाचे ते कार्याध्यक्ष होते.

## 'मुलांचे मासिक'कार बा. रा. मोडक यांची जन्मशताब्दी

'मुलांचे मासिक' हे बालमासिक नागपूरहून गेली ७१ वर्षे प्रसिद्ध होत आहे. त्याचे आद्य संपादक बाळकृष्ण रामचंद्र मोडक यांच्या जन्मशताब्दीनिमित्त नागपूर येथे बालकुमार साहित्य संमेलनाचे तेरावे अधिवेशन होणार आहे. प्राचार्य राम शेवाळकर यांच्या नेतृत्वा खाली शताब्दी समितीची स्थापना झाली आहे. मुलांचे मासिकचे संपादन सध्या माधव बाळकृष्ण मोडक हे करतात. (वार्षिक वर्गणी ६० रुपये. पाठकवाडा, मॉडेल मिल चौक, नागपूर ४४०००२.)

## स्त्रीसापनीतीचे प्रकाशन

'स्त्रीसापनीती' या माधव भावे लिखित कथासंग्रहाचे प्रकाशन मुंबई हायकोर्टाच्या कायदेतज्ज्ञ ॲडव्होकेट वसुंधरा देशपांडे यांच्या हस्ते झाले. 'भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८ अ चा गैरफायदा घेऊन, अनेक महिला पुरुषांना न्यायालयात खेचून त्यांचे जगणे दुष्कर करतात. त्या दुरूपयोगाबद्दलच्या या वास्तववादी विनोदी कथा म्हणजे आपल्यासमोर ठेवलेला आरसाच आहे. जत्रेमध्ये अंतर्गोल बहिर्गोल आरश्यांच्या आरसे महालात गेल्यावर आपण जितके सत्य व शाश्वत असतो तितकीच या कथांमधील पात्रे सत्य आहेत. माझ्या वकिलीच्या व्यवसायात या कथांत वर्णन केल्यासारखे अनेक नमुने मी पाहिले आहेत□ त्यात स्वप्नरंजन मुळीच नाही असेही त्यांनी म्हटले. (माधव भावे, ४४/२०, नवसह्याद्री, कर्वेनगर, पुणे५२ यांनी स्वत:च हे पुस्तक प्रकाशित केले आहे.)

---

## मोकाशी पुरस्कार मेघना फटांगरे यांना

म.सा.प. तर्फे उत्कृष्ट कथासंग्रहासाठी देण्यात येणारा दि. बा. मोकाशी पुरस्कार 'खोल सूक्ष्म आवेश' या मेघना फटांगरे यांच्या पुस्तकाला जाहीर करण्यात आला आहे.

---

## राजीव बर्वे यांचा काव्यसंग्रह : मोहरलेले क्षण

दिलीपराज प्रकाशनचे संचालक राजीव बर्वे हे कवी(ही) आहेत! त्यांच्या कवितांचा पहिला संग्रह बऱ्याच वर्षांपूर्वी प्रकाशित झाला होता. पण तो कोणाच्या स्मरणात राहिला असावा असे दिसत नाही. दुसरा संग्रह मात्र अनेक कारणांनी लक्षात राहील. 'मोहरलेले क्षण' हा त्यांच्या ७४ रचनांचा काव्यसंग्रह १९ मे रोजी त्यांच्या चाळिसाव्या वाढदिवशी सौ. सुचेता राळे यांच्या सुयोग प्रकाशनतर्फे प्रकाशित झाला. तोही निवडक निमंत्रितांच्या उपस्थितीत मोठ्या थाटामाटात. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे हा संग्रह संपूर्णपणे आर्टपेपरवर चार रंगी अनेक चित्रांसह छापण्यात आला आहे. ही चित्रे दीपक संकपाळ यांच्या काव्यात्म नाजूक तरल अशा रंग-रेषांतून अवतरली आहेत. यातील बहुतांश कविता पत्नी मधुमिता बर्वे यांना संबोधून लिहिलेल्या आहेत; हे आणखी एक नवल! आणि पुस्तकाची किंमत - फक्त २००रुपये. सुचेता प्रकाशनाचे दीडशेवे पुस्तक - आणि राजीव बर्वे हे सुचेता प्रकाशनाचे एक मार्गदर्शक. त्यामुळे हा सगळा गुरुदक्षिणेचा प्रकार म्हणूनही लक्षवेधक मानायला हवा. पत्नीबद्दलच्या भावनांचा हा एक आविष्कार पहा :

सुखाच्या आनंदात तर तू असतेसच<br>
पण दु:खाचे क्षण मात्र चोरून नेतेस



दुखल्यावर खुपल्यावर वारा बनून फुंकर घालतेस<br>
सगळं काही पाहतेस अन् काहीच नाही आवडलं<br>
तर सोयीस्करपणे न बघितल्यासारखं करतेस<br>
म्हणून म्हणतो प्रिये,<br>
तुला असं मुद्दाम आठवावं लागत नाही मला!<br>
रात्री स्वप्न पाहताना शेजारी असूनही तू<br>
स्वप्नातही येतेस अवचित<br>
हे स्वप्न की हे सत्य कळतच नाही मला<br>
अन ही सगळी साथ देताना<br>
काय सुख लाभतं तुला? हेही समजत नाही मला!

---

## गोविंद केळकर यांचा कविता संग्रह 'दर्शन' प्रकाशित

बेळगाव येथील प्रसिद्ध लेखक व कवी श्री. गोविंद केळकर यांचा 'दर्शन' हा कविता संग्रह नुकताच प्रकाशित झाला.

यापूर्वी त्यांचे बकुलगंध, सांज, तेजस्विता, पंढरी, गाऊ गीत नवे, अकुली बकुली, जय भारत जननी आणि गंधाली असे एकूण आठ कविता संग्रह प्रकाशित झाले असून 'दर्शन' हा त्यांचा नववा कविता संग्रह आहे. त्यातील अकुली बकुली या बालगीत संग्रहाला वाङ्मय चर्चा मंडळाचा 'विशेष साहित्य पुरस्कार' मिळाला आहे.

---

## व्ही. सिन्नरकर - अमृत महोत्सवी वर्ष

चित्रकार व्यंकटेश श्रीपाद उर्फ व्ही. सिन्नरकर यांनी मे मध्ये पंचाहत्तर वर्षे पूर्ण करून ७६व्या वर्षात पदार्पण केले. गेल्या ५०वर्षात त्यांनी १० हजार छायाचित्रे काढून अनेक पुरस्कार मिळवले. एक लाख चित्रांचा संग्रह त्यांजकडे आहे. १९४५ ते ५० या काळात कुमार साहित्य चळवळीत त्यांचा सक्रिय सहभाग होता. जाहिरात क्षेत्रात आर्ट डायरेक्टर म्हणून त्यांनी काम केले. ज्योर्तिमय बारा ज्योतिर्लिंगे, करून तर पहा इ. पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांचा काव्यसंग्रह 'पंख आणि पिसारा' प्रकाशनाच्या मार्गावर आहे. ठाण्यात चित्रप्रदर्शनाद्वारे दोन लाख रुपये निधी जमवून त्यांनी महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्तांसाठी मुख्यमंत्री निधीला दिला. शिवाजी पार्कवर मुलांचा मेळावा भरवून पंतप्रधान नेहरूंची शाबासकी त्यांनी मिळवली. ठाणे शहरातील वाङ्मयीन उपक्रमांमध्ये ते अग्रभागी असतात. त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा.

## डॉ. व. दि. कुलकर्णी - अमृतमहोत्सव

मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाचे माजी प्रमुख आणि नामवंत समीक्षक व संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. व. दि. कुलकर्णी हे दि. २३ ऑगस्ट रोजी वयाची ७५ वर्षे पूर्ण करून ७६व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. त्यानिमित्ताने पुणे येथे त्यांचा विविध संस्थांतर्फे सत्कार होणार आहे. 'माझे गुरूकुल' या पुस्तकाचे प्रकाशनही त्यावेळी होणार आहे.

## इस्टेट - जॅक केराउकची

जॅक केराऊक हा बीटनिक जमान्यातला अग्रगण्य कवी, मादक द्रव्ये घेऊन इकडेतिकडे भन्नाट भटकणे ही जीवनशैली बीटनिकांनी आचरली. नेपाळ हा त्यांना स्वर्ग वाटे. रजनीश आश्रमातही त्यांची वर्दळ असे. जॅक केराऊकच्या 'ऑन दि रोड' वगैरे कवितांनी अमेरिकेत त्याकाळी हलकल्लोळ माजवला. १९६९ मध्ये तो अतिरिक्त मद्यप्राशनाने वारला. त्यावेळी त्याचे वय होते ४७. त्याने न्यू मेक्सिकोत जमीन घेऊन ठेवलेली होती. तिची किंमत त्यावेळी ५३ हजार डॉलर होती. आज या जमिनीची किंमत १ कोटी डॉलर्स आहे; आणि तिच्यावरून त्याच्या वारसदारांमध्ये कोर्टकचेऱ्या चालू आहेत. जॅक केराऊकने आपल्या मृत्यूपत्राद्वारे आपली सर्व मालमत्ता आपली आर्ट ग्रॅबिएले हिच्या नावे सोडली होती. पण ती १९७३ साली वारली. तेव्हा ती इस्टेट जॅकची तिसरी व शेवटची बायको स्टेला सॅम्पस हिच्याकडे गेली. स्टेला १९९० मध्ये वारली. तिने आपल्या मुलांकडे इस्टेट सोपवली. पण जॅकच्या दुसऱ्या पत्नीची कन्या जान हिने त्यावर दावा सांगितला. फ्लोरिडा येथील न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. पण ती १९९६ मध्ये वारली. तिने आपला वाटा आपला भूतपूर्व पती जॉन लॅश याजकडे व सावत्र भाऊ डेव्हिड बोवर्सकडे जावा असे लिहून ठेवले. (डेव्हिड बोवर्स हा जॅकचा मुलगा नाही.) सध्या या इस्टेटीची देखभाल जॉन सॅम्पास यांजकडे आहे.

## नाटकावर बंदी

'मी नथूराम गोडसे बोलतोय' या प्रदीप दळवी लिखित नाटकाचे प्रयोग मराठी रंगभूमीवर चालू होताच एकच खळबळ माजली. संसदेतही त्यावर चर्चा झाली. केंद्रीय गृहमंत्री अडवाणी यांनी त्याच्यावर बंदी घालण्याचा सल्ला महाराष्ट्र सरकारला दिला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना हे नाटक चालू राहावे असे वाटत होते. परंतु महाराष्ट्र सरकारने या नाटकाच्या प्रयोगावर बेमुदत बंदी घालण्याचा निर्णय जाहीर केला. गुजरातीतही गांधी विरुद्ध गोडसे या नावाने हे नाटक चालू होते. त्याच्यावरही बंदी घालण्यात आली. नाट्य परि निरीक्षण मंडळाचे प्रमुख शांताराम नांदगावकर यांनी या नाटकाला परवानगी दिल्याबद्दल त्यांनी राजीनामा न दिल्यास त्यांना काढून टाकावे अशीही मागणी केली गेली.



## 'दादामुनी' चरित्रग्रंथाचे प्रकाशन

आशय फिल्म क्लब आणि अमेय प्रकाशन यांच्या वतीने आयोजित समारंभात ज्येष्ठ अभिनेते अशोककुमार यांच्या 'दादामुनी' या चरित्रग्रंथाच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन फिल्मफेअरचे माजी संपादक बी. के. करंजिया यांच्या हस्ते २८ जून ९८ रोजी करण्यात आले. नबेंदु घोष लिखित मूळ इंग्रजी चरित्र ग्रंथाचा मराठी अनुवाद शकुंतला लाटकर यांनी केला आहे. या कार्यक्रमात राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे माजी संचालक पी. के. नायर, लेखिका शकुंतला लाटकर, प्रकाशक उल्हास लाटकर यांनी आपले विचार मांडले. प्रसिद्धीचे वलय असणाऱ्या हिंदी चित्रपटसृष्टीत शिस्तीचा अभाव असल्याची खंत या वेळी बोलताना श्री. बी. के. करंजिया यांनी व्यक्त केली. केंद्र सरकारने चित्रपट सृष्टीला आर्थिक मदत करण्याची गरज नाही, कारण येथे येणारा निम्मा अधिक पैसा हा काळा पैसा आहे, असेही करंजिया यांनी सांगितले. 'अशोककुमार' म्हणजे हिंदी चित्रपट सृष्टीतील सुवर्ण अक्षराने नोंद करावे असे व्यक्तिमत्त्व आहे,' असेही त्यांनी सांगितले.

*(डावीकडून)* डॉ. सौ. शकुंतला लाटकर, उल्हास लाटकर, बी. के. करंजिया, पी. के नायर, सतीश जकातदार, विरेंद्र चित्राव

एव्हरेस्टच्या पायथ्याशी असलेल्या बेस-कॅम्पपर्यंत आणि
पुन्हा परत अशा ट्रेकिंगमधल्या अनुभवांचे रोमांचक वर्णन
लवकरच उपलब्ध!
हिमकोंदणातला हिरा
लेखक : सूर्यकांत कुलकर्णी

# पुरस्कार

**‘डव्हाळं’ कथासंग्रहाबद्दल बा. ग. केसकर यांना रोहमारे पुरस्कार**

वालचंदनगरचे लेखक व कथाकथनकार बा. ग. केसकर यांच्या ‘डव्हाळं’ या ग्रामीण कथासंग्रहाला रोहमारे पुरस्कार जाहीर झाला आहे. हा कथासंग्रह **मेहता पब्लिशिंग हाऊसने** प्रकाशित केलेला आहे. त्यांच्या कादंबरीवर ‘सुर्वंता’ हा चित्रपट रामदास फुटाणे यांनी काढला होता. रोहमारे पुरस्काराचे अन्य मानकरी : टाचा टुभा (काव्यसंग्रह) – लहू कानडे, गऊ (पुंडलीक गवळी), शेतकरी चळवळ (श्रीकांत देशमुख) ग्रामीण साहित्याची चळवळ (डॉ. वासुदेव मुलाटे).

**सिनेमाची गोष्ट – राष्ट्रीय पुरस्कार**

राष्ट्रपती के. आर. नारायणन यांच्या हस्ते १० जून रोजी दिल्ली येथ अनिल झणकर यांना ‘सिनेमाची गोष्ट’ या पुस्तकाबद्दल पंधरा हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात आला. चित्रपटविषयक उत्कृष्ट पुस्तकाला दरवर्षी राष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा एक भाग म्हणून पुरस्कार देण्यात येतात.

**श्री. विजय कुवळेकर यांना पुरस्कार**

श्री संस्थान दगडूशेट हलवाई दत्त मंदिर ट्रस्टतर्फे सकाळचे संपादक विजय कुवळेकर, ॲड. भास्करराव आव्हाड आणि कामायनी ही सेवाभावी संस्था या तिघांना प्रत्येकी पाच हजार रुपयांचे पुरस्कार देण्यात आले.

**कवी प्रदीप यांना दादासाहेब फाळके पुरस्कार**

‘ऐ मेरे वतनके लोगों, जरा याद करो कुर्बानी’ या गीताचे रचनाकार कवी प्रदीप यांना दादासाहेब फाळके पुरस्कार दि. १० जुलै रोजी नवी दिल्ली येथे एका विशेष समारंभात प्रदान करण्यात आला. ‘चल चल रे नौजवां’, ‘आओ बच्चो तुम्हे दिखाये झाँकी हिंदुस्थान की’, ‘देख तेरे संसार की हालत क्या हो गई भगवान’ वगैरे त्यांची गीते घरोघर पोचली आहेत.

**डॉ. यू. म. पठाण यांना पुरस्कार घोषित**

सोलापूर येथील आचार्य अत्रे स्मारक समितीने पाच हजार रुपयांचा पुरस्कार ६३व्या अ. भा. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. यू. म. पठाण यांना देण्याचे घोषित केले आहे.



# सेलू येथील ग्रंथालयात गप्पांचा अड्डा

*– विश्वास वसेकर*

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, ‘‘पुतळे काय उभारता? त्यापेक्षा पब्लिक लायब्ररी काढा.’’ डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतः ग्रंथप्रेमी तर होतेच; पण सार्वजनिक वाचनालये चालवणे ही प्रिय व वंदनीय व्यक्तीचा गौरव करण्याची (पुतळे उभारण्यापेक्षा सामाजिक दृष्ट्या इष्ट अशी) रीत त्यांना वाटली. निवृत्त शिक्षण उपसंचालक व थोर वाचनप्रेमी राम दासोपंत अंबेकर यांच्या चाहत्यांनी त्यांच्या नावे सेलू येथे ग्रंथालय काढले. सहा वर्षे ग्रंथालय उत्तम प्रकारे चालवून ‘ब’ वर्गात पदार्पण केले. ग्रंथालयाच्या शाखांचा विस्तार करतानाच ‘ग्रंथालये म्हणजे साहित्यप्रेमींची गप्पामंडळे’ व्हावीत या अभिनव योजनेचा शुभारंभ करीत आहोत.

‘मराठी ग्रंथजगत’च्या जून महिन्याचे संपादकीय वाचले आणि या जाणिवेच्या भूमीत बी पडले. कल्पना अंकुरली.

ही अभिनव कल्पना आम्ही तत्काळ कार्यान्वित करण्याचे ठरवले आहे. मुख्य म्हणजे अस्पष्ट, संदिग्ध कल्पनेचे नुकतेच धुके निर्माण न करता काही एक नियोजनबद्ध कार्यक्रम करण्याचा विचार आहे. लेखक, कवी, पत्रकार, ग्रंथालय कार्यकर्ते, गायक, नाट्यकर्मी या सर्वांचा गप्पा आणि भेटीसाठी एक हक्काचे ठिकाण व्हावे असे वाटते. ग्रंथ, नियतकालिके, वृत्तपत्रे, नियमांचा बाऊ न करता संदर्भासाठी खुले करून देणे हा या योजनेचा एक भाग आहे. जे साहित्यप्रेमी, वाचन प्रेमी असून या ग्रंथालयापासून योगायोगाने अजून दूर राहिले त्यांना जवळ करायचे, त्यांच्याशी वाङ्‌मयीन, वैचारिक संवाद करायचा अशी योजना आहे.

सोमवार : ग्रंथालयाचे रूपांतर कविकट्ट्यामध्ये होईल. सेलू शहरातले प्रकाश कामतीकर, गौतम सूर्यवंशी, दिलीप डासाळकर, केशव मुंगीकर, मोहन कुलकर्णी यांच्यासारखे मान्यवर कवी आपल्याला हमखास भेटणार या सुखद कल्पनेनं नवोदित कवी येतील. नव्या कविता ऐकवतील.

प्रत्येक गावात नाटकावर जीव टाकणारे काही नाट्यवेडे असतातच. त्यांची संख्या कमी असेल, पण भेटतात तेव्हा नाटकाविषयी त्यांना खूप खूप बोलायचे, ऐकायचे असते. मंगळवार हा दिवस त्यांच्यासाठी.

सेलूमध्ये सुरेल माणसांची संख्या काही कमी नाही. गाणारे तानसेन आणि त्याच्यावर लुब्ध असणारे कानसेन ग्रंथालयात निदान बुधवारी जरूर भेटतील. कुणी सुरेल तान छेडली तर बाकीचे वाचक दचकतील तसे सुखावतील. हेमा देशमुख, प्रांजली देशपांडे,

सुरेश अंभईकर, गोविंद जोशी जमले की पाहता पाहता नादलुब्धांची एक मैफिल जमेल.

गुरुवार हा ओशो भक्तांना देऊन पाहू. गप्पांचे रूपांतर गाण्याच्या मैफलीत झाले तसे इथे ध्यानधारणेत झाले तरी आनंदच आहे.

शुक्रवार हा साहित्यिक व पत्रकारांसाठी देऊ. येथे सगळी दैनिके येतात. बातमी, तिचे कात्रण, जुना अंक इ.पत्रकारांना उपलब्ध करून दिला जाईल. पत्रकार हे साहित्यिकच असतात. या दोन क्षेत्रांचा मधुर संगम दर शुक्रवारी होईल.

शनिवार हा सेलूचा बाजार दिवस. आजूबाजूच्या खेड्यातले लोक शनिवारी आवर्जून सेलूला येतात. म्हणून सेलू तालुक्यातील ग्रंथालय कार्यकर्ते शनिवारी एकत्र येतील. विचार कल्पनांची देवाण घेवाण होईल.

'ग्रंथालये ही साहित्यप्रेमींची गप्पामंडळे व्हावीत' ही कल्पना साधारणतः अशी आहे. माणसाचे लोभी असणारे लेखक लक्ष्मीकांत देशमुख (उपआयुक्त, औरंगाबाद) यांच्या हस्ते या योजनेचा प्रारंभ आम्ही करत आहोत. मा. सो. कांबळे, एम. आर. डोंगरदिवे, दिनकरराव जायभाये आणि विलासराव जोशी अशी आपापल्या क्षेत्रातली बडी मंडळी या योजनेस शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. नगरपरिषद सेलूच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात ॲड्. प्रवीण कंधारकर (उमरगा) हे 'भावसरिता' हा कार्यक्रम सादर करणार आहेत.

## रोज एक कथा छापण्याचा दैनिक देशदूतचा अभिनव उपक्रम


नाशिकहून गेली २९ वर्षे प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक देशदूतची पुणे आवृत्ती १५ एप्रिल १९९८पासून सुरू झाली आहे. तिचे संपादक म्हणून प्रसिद्ध समीक्षक शंकर सारडा यांची नेमणूक झाली आहे. पुणे देशदूतचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात दररोज एक वाचनीय लघुकथा प्रसिद्ध करण्यात येते; तसेच रोज एका नवीन पुस्तकाचा परिचय देण्यात येतो. ज्येष्ठ नागरिकांसाठीही एक सदर चालवण्यात येत असून तेही दररोज देण्यात येते. रविवार अंकाचेही वाङ्मयीन स्वरूप नजरेत भरणारे असते. लघुकथा प्रसिद्ध करण्यासाठी मासिके फारशी उरलेली नसल्याने दैनिक देशदूतच्या या अभिनव उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत आहे. मराठी वृत्तपत्रांमध्ये एक नवे वळण निर्माण करणारे हे दैनिक आहे असे मत अनेक नामवंत साहित्यिकांनी व्यक्त केले आहे.
(दैनिक देशदूत, देशदूत भवन, ५९ नवी पेठ, शास्त्री रोड,
अलका टॉकीज पुढे, पुणे - ३०. फोन - ५३८६५१, ५३९६१७)



# वाचावेसे असे काही....

| | | |
|---|---|---|
| पर्व | कादंबरी | अनु. सौ. उमा कुलकर्णी |
| तंतू | कादंबरी | अनु. सौ. उमा कुलकर्णी |
| वंशवृक्ष | कादंबरी | अनु. सौ. उमा कुलकर्णी |
| डोंगराएवढा | कादंबरी | अनु. सौ. उमा कुलकर्णी |
| डायरी ऑफ ॲन फ्रँक | कादंबरी | अनु. मंगला निगुडकर |
| चीपर बाय दि डझन | कादंबरी | अनु. मंगला निगुडकर |
| चितेवरच्या कळ्या | कादंबरी | वसंत गायकवाड |
| आंधळी | कादंबरी | अनु. शान्ता ज. शेळके |
| चौघीजणी | कादंबरी | अनु. शान्ता ज. शेळके |
| सिटी ऑफ जॉय | कादंबरी | अनु. अनिल कुलकर्णी |
| सागरतीरी | कादंबरी | अनु. अंजनी नरवणे |
| आपण सारे अर्जुन | ललित | व. पु. काळे |
| स्नेहधारा | ललित | वि. स. खांडेकर |
| निर्वाचित कलाम | ललित गद्य | अनु. मृणालिनी गडकरी |
| मृद्‌गंध | ललित गद्य | इंदिरा संत |
| शेलका साज | ललित गद्य | शिवाजी सावंत |
| कोलाज | ललित गद्य | शिरीष पै |
| द प्लेन ट्रूथ | राजकीय | अनु. माधव मोर्डेकर |
| बोफोर्स | राजकीय | अनु. माधव मोर्डेकर |
| वॉर्सा ते हिरोशिमा | राजकीय | वि. स. वाळिंबे |
| काचवेल | आत्मकथन | आनंद यादव |
| अनुभव : बासु भट्टाचार्य | आत्मकथन | शब्दांकन : अशोक राणे |
| प्रवाहातील पक्षी | आत्मकथन | निलू गव्हाणकर |
| आय डेअर : किरण बेदी | चरित्र | अनु. आशा कर्दळे |
| पावसाआधीचा पाऊस | कथासंग्रह | शान्ता ज. शेळके |
| परिचय | कथासंग्रह | अनु. माधवी देसाई |
| आपण आणि आपले आरोग्य | आरोग्य | अनु. प्रमोद जोगळेकर |

# पुस्तक परिचय




**मदर तेरेसा यांनी विशद केलेला आनंदमय जीवनाचा संजीवक मंत्र**

## *आनंदाचे अंतरंग*

**संपा.: जया चलिहा, एडवर्ड ले जॉली**
**अनु: फादर फ्रान्सिस दिब्रिटो**

मदर तेरेसा यांनी वेळोवेळी व्यक्त केलेल्या विचारांचे संकलन जया चलिहा आणि एडवर्ड ले जॉली यांनी 'दि जॉय इन लव्हिंग' या नावाने केले. पेंग्विनने ते प्रसिद्ध केले. त्याचा मराठी अनुवाद फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांच्यासारख्या जाणकार अधिकारी व्यक्तीने करणे विशेषच औचित्यपूर्ण आहे. 'आनंदाचे अंतरंग' आणि 'मदर तेरेसांचा अमृतानुभव' या शीर्षकातूनच या अनुवादाचे मराठीपण मनावर ठसते.

प्रस्तावनेत मदर तेरेसा यांचे अल्पचरित्र दिले आहे. २६ ऑगस्ट १९१० रोजी युगोस्लाव्हियात ॲग्नेस बोजाझियू हिचा जन्म झाला. शिकत असताना भारत हा देश आणि तेथील मिशनऱ्यांचे कार्य याची माहिती मिळाल्याने २६ सप्टेंबर १९२८ रोजी घर सोडले. ६ जानेवारी १९२९ रोजी ती भारतात आली. दार्जिलिंग येथे लॉरेटो सिस्टर्स मिशनमध्ये प्रशिक्षण झाले. १९३१ मध्ये शुद्धता, अपरिग्रह आणि आज्ञाधारकत्व यांचे व्रत तिने घेतले व तेरेसा हे नाव धारण केले.

आरंभी सेंट मेरी हायस्कूलमध्ये शिक्षिका व पुढे मुख्याध्यापिका म्हणून काम केले. १९४६साली रेल्वेने दार्जिलिंगला जात असताना तेरेसांना प्रभू येशूचा साक्षात्कार झाला. 'गरीबातल्या गरीबात काम कर. म्हणजे तू माझीच सेवा केल्यासारखे होईल. तुझ्याकडून माझी तशी अपेक्षा आहे.' लॉरेटो कॉन्व्हेंटमधील शिक्षिकेचे काम सोडण्यासाठी त्यांनी रोमच्या कॅथॅलिक धर्मपीठाची अनुज्ञा मिळवली. पाटणा येथे मेडिकल मिशनरीज सिस्टर्स



हॉस्पिटलमध्ये कोर्स करून कलकत्त्याच्या झोपडपट्टीत दीनदरिद्री सेवेला आरंभ केला. "होम ऑफ दि लिटल सिस्टर्स ऑफ दि पुअर' या संस्थेतर्फे काम करीत असताना एका गृहस्थाने त्यांना घराचा वरचा मजला उपलब्ध करून दिला. 'मिशनरीज ऑफ चॅरिटी' ही नवी संस्था काढून सेवाकार्याचा व्याप पुढे वाढवत राहिल्या. ७ ऑक्टोबर १९५० रोजी या संस्थेला व्हॅटिकनची मान्यता मिळाली. कार्यकर्त्या स्त्रियांचीही पुढे संख्या वाढत गेली.

२२ ऑगस्ट १९५२ रोजी मरणासन्न व्यक्तींसाठी कालीघाटला काली मंदिराजवळ एक शुश्रुषागृह स्थापन केले. सर्क्युलर रोडवर 'मदर हाऊस' मधून सर्व कारभार तेथे हलवला.

बेल्जियममधील जॅकलिन दे डेकर यांना आपल्या आजारामुळे मदर तेरेसा यांच्या कामात सहभागी होता येईना. त्यांना दृष्टान्त झाला, "तू दुःखभोग भोगायला तयार आहेस का? त्यामुळं दुसरा माणूस काम करू शकेल." त्या बाई आजही काम करीत आहेत.

१९६३पासून मदर तेरेसा यांच्या कार्याचा द्रुत गतीने विस्तार होत राहिला. १९६४मध्ये सहावे पोप पॉल यांनी मिशनरी ऑफ चॅरिटीच्या मुलांबरोबर न्याहारी केली. त्याचबरोबर आपली मोटार कार मदरना भेट दिली. लिलावात तिची पाचपट किंमत आली. पोप पॉलच्या आज्ञेवरून १९६७मध्ये तेरेसांनी रोमच्या सीमेवर आश्रम उभारला. देशोदेशी शाखा निघत राहिल्या. मरणासन्न गृह, शिशुभवन, कुष्ठरोगधाम असे वेगवेगळे प्रकल्प आश्रमातर्फे हाती घेतले जातात. ३६ देशात सहाशे आश्रम आज आहेत. १९८०साली शांततेचा नोबेल पुरस्कार त्यांना मिळाला. त्यांच्या कार्याला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली. सेवाकार्य अखंड चालू राहिले.

फादर फ्रान्सिस दिब्रिटो हे मदर तेरेसा यांना रोममध्ये १९७९ साली भेटले होते. त्या भेटीचे वर्णन त्यांनी छान केले आहे. तासभर गप्पा झाल्या. मदरनी त्यांना दुसऱ्या दिवशी प्रार्थनेचं पौरोहित्य करायला बोलावले. मदर तेरेसा यांना पवित्र भाकरीचा परमप्रसाद देताना त्यांना मदरच्या हाताचा स्पर्श झाला; त्या स्पर्शानं आपण पावन झालो असं फादर दिब्रिटो यांना वाटलं. कारमधून आश्रमाकडे जाताना कार वाटेत बंद पडली. पावसात भिजलेल्या फादर दिब्रिटोच्या पाठीवरचं पाणी त्यांनी आंघोळीनंतर आईनं बाळाला खरवडून साफ करावं तसं जोरजोरात घासून आपल्या रुमालानं पुसलं. केसांवरून हात फिरवला. त्या अमृतस्पर्शाची धन्यताही वेगळीच!

५ सप्टेंबर १९९७ रोजी मदर तेरेसा ८७व्या वर्षी ख्रिस्तवासी झाल्या. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर अशा वर्षभरातील प्रत्येक दिवसासाठी एकेक विचार मदर तेरेसा यांनी दिलेला आहे. त्याचे मराठीकरण फादर दिब्रिटो यांनी अत्यंत तळमळीने केले आहे. भारतीय संत–अध्यात्म परंपरेतील शब्दांचाही जरूर तेथे वापर केला आहे. परंतु मूळचा ख्रिश्चन बाजही अनेक ठिकाणी कायम ठेवला आहे.

उदा. 'देवा, मला विश्वासाचं वरदान दे.' 'तुझी सेवा करण्याचं महद्भाग्य मला

लाभलेलं आहे.', 'आजच करुणेचा श्रीगणेशा झाला पाहिजे.', 'देव आपल्या अंतर्यामी वास करतो. मनाची निर्मळता म्हणजे मोकळेपणा. आपल्याला सात्विक वैराग्य लाभतं.' 'नम्रता ही पावित्र्याची पहिली पायरी आहे.' 'श्रद्धा हे देवाचं दान आहे. श्रद्धेशिवाय जीवन अशक्य आहे. प्रेम आणि श्रद्धा हातात हात घालून वावरतात.', रानावनात देवाचा शोध करू नका. तो तिथं नाही. तो तुमच्याजवळ आहे. तो तुमच्याबरोबर आहे.' 'शांतीच्या प्रस्थापनेसाठी आपल्याला अण्वस्त्रांची गरज नसून, प्रेमाची आणि करूणेची गरज आहे.' 'कर्ता करविता तोच आहे.' 'प्रार्थना म्हणजे आनंदाचे डोही आनंदतरंगच.'

ही वाक्ये वाचताना आपण आपल्याच कोणा संत-कवीची वचने वाचत आहोत असे वाटते. 'मला मृत्यूकडून जीवनाकडे ने, असत्याकडून सत्याकडे ने' याच सुरात त्या युद्धाकडून शांतीकडे ने, द्वेषाकडून प्रेमाकडे ने' असे सांगतात.

मदर तेरेसा यांच्या या वचनांचे विषयही तसे आपल्या भारतीय मनाला भावणारे असेच आहेत. प्रार्थना, श्रद्धा, प्रेम, सेवा, शांती, ईश्वर, आनंद, नम्रता, कर्तव्य, सौंदर्य, दान, समानता, अध्यात्म, धनदौलत, शुचिता, आत्मज्ञान, मौन.

त्याचबरोबर ख्रिश्चन धर्मातील अनेक संदर्भ या वचनांत येतात. शेजाऱ्यावरील प्रेम, प्रार्थना, करुणा, क्षमा, ईश्वरी कृपा, या कल्पनांना ख्रिश्चन धर्मात वेगळे संदर्भ आहेत. ईस्टर, स्वर्गीय पिता, देवाचा पुत्रा, नाताळ, बायबल, क्रूस, पावित्र्य इ. कल्पनाही आपल्यापेक्षा वेगळ्या आहेत. या वचनांद्वारे मदर तेरेसांनी बालक, तरुण, रोटेरियन्स, लायन सदस्य, राज्यकर्ते, साहित्यिक इ.ना आवाहन केले आहे.

साहित्यिकांना त्या म्हणतात : 'मी जे करते ते तुम्हाला करता येणार नाही. तुम्ही जे करता ते मला जमणार नाही. देवानं आपल्या प्रत्येकासाठी काहीतरी जीवितकार्य आखून ठेवलं आहे. ते आपण पूर्ण केलं तर आपण सर्वजण एकत्रपणे देवासाठी काहीतरी सुंदर करू शकतो. लेखक, धर्मगुरू, समाजसेवक, किंवा कुष्ठरोगी यांना देवानं विशेष असं दान दिलेलं आहे. आपल्या प्रत्येकामध्ये त्याच्या सौंदर्याचा अंश आहे.' (१०३)

तरुणांना त्या म्हणतात, 'तुमची हृदयं देवाच्या प्रेमासाठी उघडा, तो ते प्रेम तुम्हांला देणार आहे, ही तुमच्यासाठी फारच सुंदर गोष्ट आहे. जेव्हा तुम्ही प्रार्थना करता तेव्हा देवाकडे देण्यासाठी, अगदी कष्ट पडेपर्यंत देण्यासाठी धैर्य मागा.' (९१)

रोटेरियन्स इ. स्वयंसेवी संघटनांच्या सदस्यांना त्यांचे सांगणे आहे, "तुम्ही वजनदार माणसं आहात, तुमच्याकडे पैसा आहे. सत्ता आहे. वजन, सत्ता, पैसा यांचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी करा. मुख्यत्वे गरीबांसाठी करा." (९०)

स्वयंसेवकांना उद्देशून त्यांनी म्हटले आहे, "प्रभूला लोकांपर्यंत पोचवा. शब्दांतून नव्हे तर कृतीमधून... प्रभूचा आनंद ही तुमची शक्ती आहे. तिचं जतन करा. प्रसन्न आणि



सुखी असा." (७७)

आपल्या सहकारी सिस्टर्सना त्या बजावतात, "तुम्ही ब्रह्मवादिनी आहात. संयमातलं सौंदर्य तुम्ही अनुभवीत आहात. संयम हा प्रेमाचा प्राण आहे." (७०)

शब्द साधे आहेत. पण त्या प्रत्येक शब्दामागे मदर तेरेसा यांच्या आयुष्यभरच्या तपस्येचे सामर्थ्य आहे. म्हणून या साध्या शब्दांतही मंत्राचे बळ आहे.

*आनंदाचे अंतरंग, पृष्ठे ११२, पंचाहत्तर रुपये.*

---

### भारतातील विविध समस्यांचे मूळ आपल्या मानसिकतेत आहे का?

## एक एक पाऊल

**ओशो रजनीश**

'एक एक पाऊल' मध्ये ओशो रजनीश यांच्या दहा प्रवचनांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रवचनांमध्ये दारिद्र्य निर्मूलन, जिज्ञासा-साहस-इच्छा, भारतातील धार्मिकता, संघटित धर्मांचे स्वरूप, वैचारिक क्रांतीची गरज, समाजपरिवर्तन, संततिनियमन असे विषय आलेले आहेत. त्या प्रत्येक बाबतीत ओशो रजनीश यांचे चिंतन हे रूढ मतप्रणालीपेक्षा वेगळे आहे, आणि अनेकांना ते धक्कादायकही वाटेल. प्रचलित व्यवस्थेवर हल्ला चढविण्यात रजनीशांना एक प्रकारचा आनंद वाटे आणि लोकांनी खडबडून जागे व्हावे वा वादाला प्रवृत्त व्हावे अशा प्रकारे विषयाची मांडणी करण्यात त्यांचा हातखंडा होता. परंतु विशिष्ट विषयावरील आपली मते मांडत असताना रजनीश दृष्टान्त व उदाहरणे देऊन अत्यंत रंजकपणे आपल्या प्रवचनातील युक्तिवादाची आखणी करीत. या पुस्तकातील प्रत्येक प्रवचन हे अशा समर्पक युक्तिवादाने परिपूर्ण आहे.

'एक एक पाऊल' या पहिल्याच प्रवचनात जपानमधील दोन छोट्या राज्यांतील लढाईच्या वेळी घाबरलेल्या सैनिकांना एका फकिराने कसा धीर दिला आणि विजयाच्या प्रेरणेने भारावून टाकले याची कथा दिली आहे. (सुपरहिट 'शोले'मध्ये हीच कल्पना वापरली आहे.) हा फकीर नाणे फेक करून कौल तुमच्या बाजूचा आहे, तुम्हीच जिंकणार हे त्यांना सांगतो. शत्रूवर ते सैनिक मग उत्साहाने तुटून पडतात. विजयी होऊन परततात. फकिराला धन्यवाद

देतात. तेव्हा तो फकीर ते नाणे दाखवतो. त्याच्या दोन्ही बाजूंना छापच असतो. काटा नसतो. रजनीश ही कथा सांगून भाष्य करतात, "आपण जिंकणार या कल्पनेने भारलेले आहोत की हरणार या कल्पनेने घाबरलेले आहोत. यावरच आयुष्यातल्या कुठल्याही कामाची सफलता अवलंबून असते, थोडेसे सामर्थ्य आणि प्रचंड आशा असलेले लोक काहीही करू शकतात. प्रचंड सामर्थ्य आहे पण मन निराशेने पछाडलेले असेल तर लोक काहीही करू शकत नाहीत. विजयाच्या आशेने प्रेरित होऊन जे लढतात ते विजयी होतात.

पैशाच्या संदर्भात रजनीश म्हणतात : " पैशाची तुम्हांला काळजी पडू नये. काम उभं राहिलं तर पैसा आपोआप येतो. फक्त लाखाचा विचार कराल तर कटकट होईल. ज्याच्याकडे लाख रुपये असतात त्या माणसाची पैसा सोडण्याची ताकद तेवढीच कमी असते." तेव्हा हिंमतीनं कामाला भिडलं तर ते पुरं होण्यात अडचण येत नाही.

जिज्ञासेला जीवनापासून मुक्त करा, संस्कारांपासून मुक्त करा आणि आपली जिज्ञासा आपली स्वत:ची करा, व्यक्तिगत करा. जिज्ञासेला जोड हवी धैर्याची. जो माणूस एक पाऊल उचलू शकतो तो हिमालय पादाक्रांत करू शकतो. कारण या जगात एका पावलापेक्षा अधिक चालण्याचा प्रश्‍नच येत नाही. कोणीही एका पावलापेक्षा जास्त चालतही नाही. धाडस हवं ते एक पाऊल उचलण्याचं. हे पाऊल उचलण्याची इच्छा त्यासाठी हवी असते. इच्छा म्हणजे अभीप्सा, तळमळ, जीवघेणी तहान. जेव्हा डोळे उघडतात तेव्हाच ती तहान अभीप्सा बनते. असे एक प्रत्येकाची मानसिकता बदलणारे सूत्र रजनीशांनी सांगितले आहे.

"भारत धार्मिक आहे का?" या विषयावरील प्रवचनात धक्कादायक व खळबळजनक विधानांची लयलूट आहे. आपण धार्मिक वा आध्यात्मिक आहोत असे मानणे ही आत्मवंचना आहे असे त्यांचे स्पष्ट मत आहे. आपला संबंध धड विज्ञानाशीही नाही आणि अध्यात्माशीही नाही. आपण भारतीय लोकं त्रिशंकूसारखे मध्ये लटकलेले आहोत असे त्यांना वाटते. देवळात जाणे व धार्मिक असणे या दोन गोष्टींचा काहीही संबंध नाही. देवळात जाणे हे एक शारीरिक भौतिक घटना आहे. धर्म ही आत्मिक यात्रा आहे.

भारत हा देश धार्मिक नाही याची कारणेही रजनीश देतात.

१) भारतीची धर्माबद्दलची संकल्पना ही परलोकाशी, मृत्यूनंतरच्या जीवनाशी निगडित आहे. पृथ्वीवरील जीवन सुखी-आनंदी व्हावे यावर भर देणारी नाही. परलोकाविषयीच्या अतिचिंतनामुळे भारतीय धर्म पलायनवादी, पळपुटा बनला.

२) माणूस म्हणजे फक्त आत्मा; शरीर ही माया आहे या समजुतीमुळे धर्माने ऐहिक जीवनाची सतत हेटाळणी केली. शरीराची उपेक्षा केल्याने लोक जास्त अधार्मिक बनले. शरीराला क्लेश देणे म्हणजे धार्मिक होणे असा गैरसमज प्रतिष्ठा पावला.

३) धर्माचा महिमा भारतात विश्वासावर ठेवला गेला; ज्ञानावर नाही. ज्ञानाकडे पाठ



फिरवून केवळ विश्वासावर कुठल्याही गोष्टीची कास धरणारा माणूस हा खोटा व आत्मवंचक असतो. त्यामुळे सगळा देश संकटात सापडतो.

४) सत्य हे आपल्याला गुरू, ज्ञाता, ग्रंथ वा शास्त्र यातून मिळू शकते हा समजही भारतीयांच्या धर्मप्रवृत्तीला चुकीच्या दिशेने नेणारा ठरला आहे. रजनीशांच्या मते सत्य हे स्वत:चे स्वत:ला शोधावे लागते. दुसरा कोणी तुम्हांला सत्य देऊ शकत नाही. "तुमच्या जागी दुसरं कुणी प्रेम करून तुम्हांला प्रेमाचा अनुभव येईल का? दुसरा कोणी निधन पावला तर तुम्हांला मृत्यूचा अनुभव आला असे म्हणता येईल का?" असा प्रश्न ते विचारतात. सत्य हे पाठांतरातून, ग्रंथातून, मिळत नाही. आपला धर्म केवळ शाब्दिक आहे. तो सत्याच्या पायावर उभारलेला धर्म नाही.

अशा चार सूत्रांद्वारे भारतीयांच्या अध्यात्म प्रेमाचा फोलपणा रजनीश सिद्ध करू पाहतात.

तरुण, संन्यासी व जीवनजागृती केंद्रे यांच्या संघटनेची महतीही रजनीश प्रतिपादन करतात. रजनीश आश्रमाची स्थापना होण्याआधीचे हे प्रवचन आहे. परंतु त्यामागचे सूत्र आरंभापासूनच स्पष्ट दिसते.

भारतात आपण श्रेष्ठ पुरुषांना एकदम देव बनवून टाकतो. त्यामुळं भारतात माणूस मोठा होऊ शकत नाही. ज्या लोकांमुळे आपले माणूसपण उच्चपदाला जाऊ शकते त्यांना आपण माणूसपणाच्या परीघाबाहेर घालवतो. त्यामुळे छोटं राहणं हेच आपलं प्राक्तन बनून गेलं. या देशात अनेक महापुरुष होऊन गेले. पण इथला माणूस खुजाच राहिला - याची कारणमीमांसा करताना रजनीश पुढे म्हणतात, "या देशाच्या राजकारणात मला रस नाही. नेत्यांमध्ये मला रस नाही. मला रस आहे तो या देशाच्या झोपलेल्या आत्म्यामध्ये. कुठून तरी हा देश जागा झाला पाहिजे. जगाच्या शर्यतीत मागे पडू नये अशा जिद्दीने पुढे सरसावला पाहिजे."

"जीवनाचं सूत्र विस्तार हे आहे, ब्रह्म या शब्दाचा अर्थ विस्तार हाच आहे. परंतु आपले भारतीय तत्त्वज्ञान सांगते की अपरिग्रह, त्याग, वैराग्य स्वीकारा. लहान व्हा. जे आहे त्यापासून पळ काढा. मरत नाही तोपर्यंत लहान लहान होत जगत राहा-" अशी भारतीय मानसिकतेची कडक निर्भत्सनाही करताना रजनीश कचरत नाहीत. त्यासाठी संतोष नको, असंतोष पाहिजे. स्थैर्य नको, गती पाहिजे. अनंताला जिंकण्याची, विस्तार पावण्याची अभीप्सा पाहिजे अशी मागणी ते करतात.

संततिनियमनाबाबत मात्र रजनीशांना हा विस्तारवाद मान्य नाही. विवाहितांवर जास्त कर ठेवावा, जास्त मुलं असणाऱ्यांवर जास्त कर लावावा, असाही मार्ग ते सुचवतात. देव मुलं पाठवतो, त्याला थांबवण्याचा तुम्हांला अधिकार नाही असे लोक म्हणतात. रजनीश

विचारतात, देव रोगराई पाठवतो, मग रुग्णालये चालवून रोगराईला तुम्ही का रोखता?

रजनीशांची बौद्धिके ही अशी आपल्या रूढ समजुतींना, विचारांना आव्हान देतात, हादरा देतात. उद्ध्वस्त करतात. उदाहरणे, दृष्टान्त याबरोबरच एक प्रकारचा बिनतोड युक्तिवाद करण्यात ते निष्णात आहेत. त्यामुळे त्यांची कॅसेटवरील प्रवचने ऐकणे किंवा त्यांचे ग्रंथ वाचणे हा एक बौद्धिक झटापटीचा मामला ठरतो.

*एक एक पाऊल, ओशो रजनीश, पृष्ठे १३२, शंभर रुपये*

# ओशो : एक परिचय

बुद्धत्वाच्या प्रवाही धारेमधला ओशो एक नवा प्रारंभ आहेत. ते भूतकाळाच्या कोणत्याही धार्मिक परंपरेची किंवा शृंखलेची एक कडी नाहीत. ओशोपासून एका नव्या युगाचा प्रारंभ होतो आणि तेव्हाच काळ दोन स्पष्ट खंडांमध्ये विभागला जातो. ओशोच्या पूर्वीचा काळ आणि ओशोनंतरचा काळ.

ओशोच्या आगमनाने एका नव्या माणसाची, एका नव्या जगाची सुरुवात झाली आहे. याची आधारशीला भूतकाळाच्या कोणत्याही धर्मामध्ये नाही, कोणत्याही तात्त्विक विचारपद्धतीमध्ये नाही. ओशो आजच्या सुस्नात धार्मिकतेचे आद्य पुरुष आहेत - संपूर्णपणे.

## संबुद्ध रहस्यदर्शी

मध्यप्रदेशातील कुचवाडा गावात ११ डिसेंबर १९३१ला जन्मलेल्या ओशोचं लहानपणाचं नाव रजनीश चंद्रमोहन होतं. त्यांनी आयुष्याच्या सुरुवातीलाच आपल्या निर्भय स्वंतत्र आत्म्याची ओळख करून दिली. संकटांशी खेळणं त्यांना आवडत असे. पावसाळ्यातल्या पूर आलेल्या नदीमध्ये शंभर फूट उंचावरच्या पुलावरून उडी मारून पोहणं हा त्यांच्या दृष्टीनं साधा खेळ होता. तरुण ओशोंनी आपली अलौकिक बुद्धी आणि दृढता यांच्या सहाय्यानं पंडित-पुरोहित, मुल्ला-पाद्री, संत-महात्मे या सगळयांच्या मूर्खपणाचं आणि



ढोंगीपणाचं बिंग फोडलं. हे लोक स्वानुभवाखेरीजच गर्दीचे नेते बनून राहिले होते.

२१ मार्च १९५३ला वयाच्या एकविसाव्या वर्षी ओशोंना संबोधि (परम जागरण) प्राप्त झाली. संबोधिच्या संबंधात ते म्हणतात, 'आता मी कसल्याही प्रकारचा शोध करीत नाही आहे. आस्तित्वाने आपली सगळी दारं माझ्यासाठी उघडून ठेवली आहेत. त्या काळात ते जबलपूरच्या एका कॉलेजमध्ये तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी होते. संबोधि घडल्यानंतरही त्यांनी आपलं शिक्षण चालू ठेवलं आणि सन १९५७ मध्ये त्यानी सागर विश्वविद्यालयातून तत्त्वज्ञानाची एम.ए.ची पदवी प्रथम श्रेणीमध्ये प्रथम येऊन सुवर्णपदकासह मिळवली. यानंतर ते जबलपूर विश्वविद्यालयामध्ये तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून काम करू लागले. विद्यार्थ्यांमध्ये ते 'आचार्य रजनीश' या नावाने अतिशय लोकप्रिय होते.

विश्वविद्यालयामधील आपल्या नऊ वर्षांच्या अध्यापन काळात ते भारतभर भ्रमणही करीत होते. त्यांच्या सभांना साधारणपणे हजारोंच्या संख्येनं श्रोते उपस्थित असत. ते आध्यात्मिक जन जागरणाची एक लाटच पसरवीत होते. त्यांच्या वाणीमध्ये आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये अशी एक जादू होती, असा एक सुगंध होता की जो एखाद्या परलोकातूनच आलेला असावा.

सन १९६६ मध्ये ओशोंनी विश्वविद्यालयातील प्राध्यापकपदाचा राजीनामा दिला. अस्तित्वाने ज्या परम भगवत्तेचे भांडार त्यांच्यावर उधळून दिले होते ते भांडार सबंध मानवतेसह ते वाटून घेऊ शकतील आणि एका नव्या मानवाचा जन्म घडवून आणण्याच्या प्रक्रियेमध्ये आपली संपूर्ण ताकद वापरू शकतील असा त्यांचा सिद्धान्त होता. ओशोंचा हा नवा माणूस, 'झोर्बा द बुद्ध' हा एक असा माणूस आहे की जो झोर्बा प्रमाणे भौतिक जीवनाचा संपूर्ण आनंद उपभोगण्हंही जाणतो आणि जो गौतमबुद्धाप्रमाणे मूक होऊन ध्यानात उतरण्यासही सक्षम आहे - असा माणूस जो भौतिक आणि आध्यात्मिक दोन्ही बाजूंनी समृद्ध आहे. झोर्बा द बुद्ध हा संपूर्ण, अखंड, अविभाजित असा माणूस आहे. या नव्या माणसाकडूनच पृथ्वीचा भावी काल घडवला जाणार आहे.

सन १९७० मध्ये ओशो मुंबईमध्ये राहण्यास आले. भौतिक समृद्धीला विटून गेलेले आणि जीवनाच्या काही अधिक गूढ रहस्यांचे ज्ञान करून घेण्यासाठी उत्सुक असलेले पाश्चिमात्य सत्यशोधकही त्यांच्याकडे येऊ लागले होते. ओशोंनी त्यांना सांगितलं की पुढची पायरी ध्यान ही आहे. जीवनात सार्थकतेची फुलं फुलवण्यात ध्यानाचीच मदत होईल. याच वर्षी सप्टेंबरमध्ये, हिमालयातील मनाली या ठिकाणी आयोजित केलेल्या आपल्या एका शिबिरामध्ये ओशोंनी नव-संन्यासाची दीक्षा देण्यास प्रारंभ केला. याच सुमारास ते आचार्य रजनीश या ऐवजी भगवान श्रीरजनीश या नावाने ओळखले जाऊ लागले.

सन १९७४मध्ये ते आपल्या बऱ्याच संन्याशांच्या समवेत पुण्याला आले. तेथे श्री रजनीश आश्रमाची स्थापना झाली. पुण्याला आल्यानंतर त्यांचा प्रभाव विश्वव्यापी होऊ लागला. पुण्यातील या श्रीरजनीश आश्रमामध्ये ओशोंनी मानवाच्या बुद्धीच्या विकासाचा प्रत्येक

पैलू आपल्या रोजच्या प्रवचनांमधून स्पष्ट केला. बुद्ध, महावीर, कृष्ण, शिव, शांडिल्य नारद, येशू यांच्याबरोबरीनं भारतीय आध्यात्म क्षेत्राच्या आकाशातली अनेक नक्षत्रं – आदिशंकराचार्य, गोरख, कबीर, नानक, मलूकदास, रैदास, दरियादास, मीरा यांच्यावर त्यांनी दिलेली प्रवचनं उपलब्ध आहेत. जीवनाचं असं कोणतंही क्षेत्र नाही ज्याचा उल्लेख त्यांच्या प्रवचनांमध्ये झालेला नाही. योग, तंत्र, ताओ, झेन, हसीद, सुफी सारख्या विभिन्न साधन-परंपरांमधील गूढ रहस्यांवर त्यांनी विस्तृत प्रकाश टाकलेला आहे. याचबरोबर राजकारण, कला, विज्ञान, मनोविज्ञान, तत्त्वज्ञान, शिक्षण, परिवार, समाज, गरिबी, लोकसंख्या – विस्फोट, पर्यावरण तसेच परमाणु युद्ध आणि त्याहून मोठ्या एड्स या रोगांसारखी संभाव्य संकटे अशा अनेक विषयांवर त्यांची क्रांतिकारक भाष्ये आहेत.

शिष्य आणि साधक यांच्यासाठी दिली गेलेली ही त्यांची प्रवचनं साडेसहाशेहून अधिक पुस्तकांच्याद्वारे प्रकाशित झालेली आहेत आणि त्यांचे तीसहून अधिक भाषांमध्ये अनुवादही झालेले आहेत. ते म्हणतात, 'माझा संदेश हा एखादा सिद्धांत किंवा चिंतन नाही. माझा संदेश म्हणजे रूपांतराची एक किमया, एक विज्ञान आहे.'

ओशो आपल्या निवासामधून दर दिवशी फक्त दोन वेळा बाहेर येत असत. सकाळी प्रवचन देण्यासाठी आणि संध्याकाळी सत्याच्या प्रवासाला निघालेल्या साधकांना मार्गदर्शन करण्यासाठी आणि नव्या भक्तांना संन्यास दीक्षा देण्यासाठी.

१९८० मध्ये कट्टरपंथी हिंदू समुदायाच्या एका सदस्यानं त्यांच्या एका प्रवचनाच्या वेळी त्यांची हत्या करण्याचाही प्रयत्न केला.

अचानक शारीरिक आजारपण आल्यामुळे १९८१च्या वसंत ऋतूमध्ये त्यांनी मौन धारण केलं. चिकित्सकांच्या सल्ल्यानुसार त्यांना त्याच वर्षी जूनमध्ये अमेरिकेला नेण्यात आलं. त्यांच्या अमेरिकन शिष्यांनी ओरेगॉन राज्याच्या मध्यभागामध्ये ६४,००० एकर जमीन विकत घेतलेली होती. तिथे त्यांनी ओशोंना राहण्यासाठी आमंत्रित केलं. हळुहळू ही अर्धवालुकामय जागा एका फुलत्या कम्यूनमध्ये रूपांतरित होऊ लागली. तिथे सुमारे ५००० प्रेमी मित्र एकत्र राहून आपल्या सद्गुरूच्या सान्निध्यात आनंदी आणि उत्सवी वातावरणामध्ये एका आगळयावेगळया नगराची उभारणी केली. लवकरच हे नगर रजनीशपुरम् या नावानं अमेरिकेच्या संयुक्त राज्यांमध्ये एक निगमीकृत शहर म्हणून मान्य केलं गेलं. परंतु कट्टरपंथी ख्रिश्चन धर्मगुरूंचा दबाव आणि राजकारण्यांचा स्वार्थ यांच्यामुळे सुरुवातीपासूनच कम्यूनच्या या प्रयोगाला अडथळा आणण्याचा प्रयत्न अमेरिकेची संघीय, राज्य आणि स्थानिक सरकारं करत होती.

एके दिवशी ज्याप्रमाणे ओशोनी मौन धारण केलं होतं तितक्याच अचानकपणे ऑक्टोबर ८४मध्ये त्यांनी पुन्हा प्रवचनं द्यायला सुरुवात केली. जीवन सत्याविषयीच्या इतक्या स्पष्टवक्त्या आणि उघड विवेचनामुळे या स्वार्थांची मुळं पुन्हा डळमळायला लागली.

१९८५ च्या ऑक्टोबरमध्ये अमेरिकन सरकारने ओशोंवर परदेश प्रवासाच्या नियमांचे



उल्लंघन केल्याचे ३५ बनावट आरोप दाखल केले. अटकेच्या वॉरंटाखेरीजच बंदुकीच्या धाकाने ओशोंना ताब्यात घेतलं. १२ दिवसपर्यंत त्यांचा जामीन स्वीकारला गेला नाही आणि हातापायात बेड्या ठोकून त्यांना एका तुरुंगातून दुसऱ्या तुरुंगात असं फिरवण्यात आलं आणि अखेरीस पोर्टलंड (ओरेगॉन) इथे नेण्यात आलं. जो प्रवास फक्त पाच तासांचा आहे तो साधारणतः आठ दिवसात पुरा करण्यात आला. तुरुंगात त्यांचा शारीरिक छळ करण्यात आला आणि इथेच संघीय सरकारच्या अधिकाऱ्यांनी त्यांना 'थेलियम' नावाचं सावकाश परिणाम होणारं विष दिलं.

१४ नोव्हेंबर १९८५ ला अमेरिका सोडून ओशो भारतात परत आले. भारतातील तत्कालीन सरकारनेही त्यांना संपूर्ण विश्वापासून अलग ठेवण्याचा पूर्ण प्रयत्न केला. तेव्हा ओशो नेपाळला निघून गेले. नेपाळमध्येही त्यांना अधिक काळ राहण्याची परवानगी मिळाली नाही.

फेब्रुवारी १९८६मध्ये ओशो जगप्रवासासाठी निघाले. याची सुरुवात त्यांनी ग्रीसपासून केली. परंतु अमेरिकेच्या दबावामुळे २१ देशांनी त्यांना देशातून घालवून तरी दिलं किंवा प्रवेशच दिला नाही. या तथाकथित स्वतंत्र व लोकशाही असणाऱ्या देशांमध्ये ग्रीस, इटली, स्वित्सर्लंड, स्वीडन, ग्रेट ब्रिटन, पश्चिम जर्मनी, हॉलंड, कॅनडा, जमेका आणि स्पेन हे देश प्रमुख होते.

ओशो जुलै १९८६ मध्ये मुंबईला आले. जानेवारी ८७ मध्ये पुण्याला आपल्या आश्रमात परत आले.

आता आश्रम ओशो कम्यून इंटरनॅशनल या नावानं ओळखला जातो. इथे पुन्हा त्यांनी आपल्या क्रांतिकारक प्रवचनांच्या द्वारा पंडित – पुरोहित आणि राजकारणी नेत्यांच्या भोंदूपणाचं आणि मानवतेविरुद्धच्या त्यांच्या कारस्थानांचं बिंग फोडायला सुरुवात केली.

या दरम्यान भारतासह साऱ्या देशातील बुद्धिजीवी वर्गाने आणि प्रसार माध्यमांनी ओशोंच्याविषयी निःपक्षपाती आणि विधायक विचार करण्याचा मार्ग स्वीकारला. लहान-मोठ्या सर्व प्रकारच्या वृत्तपत्रांमध्ये व नियतकालिकांमध्ये त्यांच्या अमृत वचनांचा उल्लेख किंवा त्यांच्या संबंधीचे लेख, बातम्या इत्यादी साहित्य प्रकाशित होऊ लागले. देशातले बहुसंख्य प्रतिष्ठित संगीत तज्ज्ञ, नर्तक, साहित्यिक, कवी, शायर ओशो कम्यून इंटरनॅशनल मध्ये जाऊ-येऊ लागले. मनुष्याला सदैव हव्याशा असलेल्या युटोपियाचं स्वप्न इथे साकार झालेलं पाहून आपल्या डोळ्यांवर त्यांचा विश्वास बसत नसे.

२६ डिसेंबर १९८८ला ओशोनी आपल्या नावापुढची भगवान ही उपाधी काढून टाकली. २७ फेब्रुवारी १९८९ला ओशो कम्यून इंटरनॅशनलच्या बुद्ध सभागृहामध्ये संध्याकाळच्या प्रवचनाच्या वेळी त्यांच्या १०,००० शिष्यांनी व प्रेमींनी एकमतानं आपल्या प्रिय सद्गुरुला 'ओशो' या नावानं संबोधण्याचा निर्णय घेतला.

१९८५ च्या ऑक्टोबरमध्ये अमेरिकेच्या रीगन सरकारच्या अधिकाऱ्यांनी जेलमध्ये ओशोना थेलियम नावाचे सावकाश परिणाम करणारे विष दिले होते. त्याचप्रमाणे प्राणघातक अशा रेडिएशनमधून जायला लावल्यामुळे त्यांचं शरीर कायम अस्वस्थ राहायला लागलेलं

होतं. आतून क्षीण होऊ लागलेलं होतं. तरीही ते ओशो कम्यून इंटरनॅशनलच्या पुण्यातल्या दि बुद्ध ऑडिटोरियममध्ये १० एप्रिल १९८९पर्यंत रोज संध्याकाळी सभेत प्रवचन देत राहिले, भक्तांना ध्यानात गुंग करीत राहिले. पुढच्या महिन्यात त्यांच्या शारीरिक यातना वाढल्या.

१७ सप्टेंबर १९८९पासून पुन्हा ते रोज संध्याकाळी फक्त अर्ध्या तासापुरते गौतम बुद्धा ऑडिटोरियममध्ये येऊन ओशो मौन दर्शन-सत्संगाच्या संगीत आणि मौनात सर्वांना बुडवत राहिले. या सभेला त्यांनी 'ओशो व्हाइटरोब ब्रदरहूड' असं नाव दिलं. ओशो १६ जानेवारी १९९०पर्यंत रोज संध्याकाळी सात वाजता 'ओशो व्हाईटरोब ब्रदरहूड' च्या सभेत अर्ध्या तासासाठी उपस्थित होत असत.

१७ जानेवारीच्या दिवशी ते सभेमध्ये येऊन फक्त नमस्कार करून परत गेले. १८ जानेवारीला 'ओशो व्हाईटरोब ब्रदरहूड' च्या संध्याकाळच्या सभेत त्यांचे वैयक्तिक चिकित्सक स्वामी प्रेम अमृतो यांनी सांगितलं की ओशोंच्या शरीराच्या यातना इतक्या वाढल्या आहेत की ते आज आपल्यामध्ये येऊ शकणार नाहीत. पण स्वतःच्या खोलीतूनच ते आपल्या सात वाजताच्या ध्यानामध्ये सहभागी होणार आहेत.

१९ जानेवारी १९९० ला दुपारी पाच वाजता ओशोंनी शरीर सोडून महाप्रयाण केलं अशी घोषणा संध्याकाळच्या सभेत करण्यात आली.

ओशोंच्या इच्छेनुसार त्याच सभेमध्ये त्यांचं शरीर दि बुद्ध ऑडिटोरियममध्ये दहा मिनिटं आणून ठेवलं गेलं. दहा हजार भक्तांनी त्यांना निरोप दिला. त्यानंतर त्यांचं शरीर अग्निसंस्कारासाठी नेण्यात आलं.

२१ जानेवारी १९९०च्या सकाळी त्यांचा अस्थि कलश च्वांगत्सू हॉलमधील संगमरवरी समाधी भवनात स्थापन केला गेला.

ओशोंच्या समाधीवर सुवर्णाक्षरांनी लिहिलेलं आहे –

OSHO
NEVER BORN
NEVER DIED
ONLY VISITED THIS PLANET EARTH
BETWEEN
DEC 11 - 1931 - JAN 19 - 1990

ध्यान आणि सृजनाचं हे आगळं नव-संन्यास उपवन, ओशो कम्यून, ओशोच्या विदेही उपस्थितीमध्ये आज सगळ्या जगामधील एक असं प्रबळ आकर्षण केंद्र बनलं आहे. इथे निरंतर नवीन लोक आत्मरूपांतरण होण्यासाठी येत आहेत आणि ओशोंच्या सघन-जिवंत उपस्थितीमध्ये अवगाहन करीत आहेत.

■



**साईबाबांचे व्यक्तित्व आणि प्रभावक्षेत्र यांचा अभ्यासपूर्ण मागोवा**

# देव जो भूवरी चालिला

**रंगास्वामी पार्थसारथी**
**अनु.: लीना सोहोनी**

शिरडीच्या साईबाबांनी १५ ऑक्टोबर १९१८ रोजी दुपारी ३ वाजता समाधी घेतली. या घटनेला ८० वर्षे होतील. परंतु त्यांच्या महात्म्यात घट न होता, शिरडीला भेट देणाऱ्या भक्तगणांची संख्या सतत वाढतच आहे. शिरडीला अनेक तारांकित भव्य सुसज्ज हॉटेल्स निघाली असून वर्षभर तेथे भाविकांची गर्दी असते. "माझी समाधी बोलेल" असे उद्‌गार त्यांनी काढले होते. श्रीमंत बुटी यांच्या वाड्यात आपल्या समाधीची जागा त्यांनीच आधी निश्चित केली होती. त्याच जागी त्यांचा मृतदेह पुरण्यात आला. उपासनी बाबा, बाळासाहेब भाटे यांनी अंतिम संस्कार हिंदू पद्धतीने केले. दासगणू महाराजांनी दिवसभर भजन केले. साईबाबांच्या जवळच्या गाठोड्यात एक हिरवी कफनी, टोपी आणि सोळा रुपये एवढी मालमत्ता आढळली. ती कोपरगावच्या न्यायाधीशांनी ताब्यात घेतली. साईसंस्थान या संस्थेची स्थापना झाली. तिच्याकडे ही मालमत्ता पुढे आली.

साईबाबांनी स्वतःबद्दल अनेक विधाने भक्तजनांसमोर केलेली होती. "मी पुनःपुन्हा जन्म घेत राहणार."(२२४). 'माझी समाधी बोलेल.' 'मी माझ्या भक्तांना माझ्याकडे खेचून घेतो. ते स्वतःहून माझ्याकडे कधीच येत नाहीत.' 'तुम्हाला माझे शब्द चमत्कारासारखे वाटतात. कारण तुम्हांला भविष्यकाळ माहीत नाही. त्यामुळे मी सांगितल्याप्रमाणे घटना घडल्या की तुम्ही माझ्यात अद्‌भुत सिद्धी आहेत असे मानता. माझ्याविषयी तुम्हांला आदरभाव वाटू लागतो. पण तो तुमचा आदरभाव मी देवाच्या दिशेला वळवून तुम्हांला त्याचा पूर्ण लाभ मिळावा असे बघतो."(२३७) 'मी माझ्या भक्तांचा गुलाम आहे. मला भक्ती प्रिय आहे.'(२३८)

साईबाबा स्वतःला ईश्वराचा प्रेषित मानत. 'प्रकृती माझी आई, पुरुष माझे वडील'

असे म्हणत. स्वत:ला फकीर म्हणवून घेत. 'फकिराने तुझी मागणी केली' असे जेव्हा म्हणत तेव्हा भक्ताला इच्छित ते प्राप्त होई. फकिराची वेषभूषा, तोंडाने अल्लाचा जप आणि मशिदीतील वास्तव्य यामुळे ते मुसलमान आहेत असे म्हटले जाई. परंतु त्यांनी आपल्या धर्माबद्दल कधीच स्पष्ट खुलासा केला नाही. ते हिंदूंना हिंदू वाटत. मुसलमानांना मुस्लीम समाधीत ते आजही जिवंत आहेत असे मानले जाते.

समाधीमागे बाबांचा सिंहासनाधिष्ठित पुतळा आहे. डाव्या पायावर उजवा पाय ठेवून साईबाबा बसलेले आहेत. ह्या मूर्तीची १९५४ मध्ये प्रतिष्ठापना झाली. तो पुतळा बाळाजी वसंत उर्फ बापूसाहेब तालीम यांनी तयार केला आहे. मूर्तीच्या डोक्यावर चांदीचे छत्र आहे. मूर्तीमागे चांदीची प्रभावळ आहे. समाधीसमोरचा सभामंडप आरतीच्या वेळी भरलेला असतो. मंदिराजवळच द्वारकामाई उर्फ मशीद आहे. त्याच पडक्या मशिदीत साईबाबांनी आयुष्यभर वास्तव्य केले. या मशिदीचे नूतनीकरण करण्यात आले आहे. तेथे अखंड धुनी धगधगत असते. जवळच १५० मीटरवर चावडी आहे. तेथे बाबा एकदिवसाआड रात्री राहत. बाबांच्या वेळचे निंबाचे झाडही व्यवस्थित जतन करण्यात आले आहे.

साईबाबांच्या निर्वाणानंतरही त्यांच्या भक्तगणांमध्ये सातत्याने वृद्धी होत आहे या घटनेचा अर्थ ज्याने त्याने आपल्या परीने लावावा. परंतु हे एक जागृत स्थान आहे आणि भाविकांच्या मनोकामना पूर्ण करण्याची गूढ शक्ती या वातावरणात आहे; तिचा प्रत्यय आल्यानेच वर्षानुवर्षे भाविक येत राहतात असे म्हणता येईल.

साईबाबांची मोजकीच चरित्रे उपलब्ध आहेत. त्यात भक्तजनांचे अनुभव व इतर ठळक घटना नमूद केलेल्या आढळतात. स्वत:बद्दल साईबाबा क्वचितच बोलत. ते कोण, कुठले याबद्दलही निश्चित माहिती उपलब्ध नाही. त्यांच्या जीवनात तशा घटनाही मोजक्याच आहेत; परंतु त्यांच्या प्रभावाने भाविक या समाधीस्थळी मोठ्या संख्येने येत राहतात हे वास्तव आहे. १९९३-९४ साली हुंडीतून १४ कोटी रुपये जमा झाले. रोज किमान एक लाख रुपये भक्तगण या हुंडीत टाकतात. आता हे दान अधिकच वाढले असेल.

साईबाबांच्या संदेशाचा पद्धतशीर प्रसार करण्याचे श्रेय नरसिंहस्वामींकडे जाते. त्यांचे मूळ नाव बी. व्ही. नरसिंह अय्यर. हे तामिळनाडूतील सेलम येथील नामवंत वकील. (जन्म २१ ऑगस्ट १८७४). १९२५ नंतर आध्यात्मिक ओढीमुळे त्यांनी रमण महर्षींच्या आश्रमात एकान्तवासात काही दिवस काढले. रमण महर्षींवर पुस्तक लिहिले. भारतभर तीर्थयात्रा केली. मेहेरबाबांच्या आदेशावरून उपासनीबाबांना भेटण्यासाठी साकोरीला गेले. साकोरीपासून शिरडी फक्त पाच किलोमीटर अंतरावर आहे. साईबाबा आपल्याला खेचून घेत आहेत असे अय्यर यांना वाटले. साईबाबांची एकलक्षी भक्ती त्यांनी सुरू केली. इतर अभ्यास बंद केला. बाबा हे परमेश्वराचे अवतार आहेत; त्यांच्या रूपाने त्रिमूर्तीच साकार झाली आहे असे त्यांना १९३१



साली जाणवले. पुण्याच्या पुरुषोत्तम अवस्थींनी त्यांची गाठ साईबाबांच्या साठ सत्तर भक्तांशी घालून दिली. त्यांनी जे काही सांगितले त्यावरून साईबाबांचे चरित्र लिहिण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात आली. त्यांनी खूप माहिती मिळवली. त्या माहितीची सत्यासत्यता त्यांनी पारखून घेतली. स्वत:चे मोठेपण मिरवणाऱ्या भोंदू व्यक्तींची असत्य कपोलकल्पित निवेदने त्यांनी केराच्या टोपलीत टाकली. १९९८ साली इन्ट्रोडक्शन टू साईबाबा हे त्यांचे पुस्तक प्रसिद्ध झाले. वर्षात त्याच्या तीन आवृत्त्या निघाल्या. अनेक भाषांत अनुवाद झाले. अनेक साईभक्तांनी पत्रे लिहिली. त्या पत्रांतील अनुभवांचे संकलन ''डिव्होटीज् एक्सपिरियन्सेस' नावाने प्रसिद्ध केले. पुढे चार खंडातील साईबाबा चरित्र त्यांनी सिद्ध केले. १९४० साली साईसुधा हे मासिक सुरू केले. नरसिंहस्वामी यांचे १९५६ साली वयाच्या ८२व्या वर्षी निधन झाले.

साईबाबांच्या समाधीला भेट देणाऱ्यांची संख्या १९४० नंतर सारखी वाढत राहिली याचे श्रेय नरसिंहस्वामींच्या या चरित्रलेखनाला व प्रचारकार्याला द्यावे लागेल.

नरसिंहस्वामींचे मुख्य शिष्य राधाकृष्णस्वामी उर्फ साईपदानंद नरसिंहस्वामींना त्यांनी बंगलोरला साई स्पिरिच्युअल सेंटर काढून साईप्रसाराचे काम करण्यास सांगितले. (१९५२) दक्षिणेत साईबाबांचा प्रचार या संस्थेने मोठ्या कळकळीने केला. राधाकृष्ण स्वामींनी पुढे नरसिंहस्वामींचे चरित्र लिहिले. (१९७३) दक्षिणेतून शिरडीला जाणाऱ्या भक्तांसाठी सोयीसुविधाही त्यांनी निर्माण केल्या. जागोजाग साईमंदिरे काढण्याचा त्यांनी सपाटा लावला. १९८० साली त्यांनी समाधी घेतली.

साईबाबांच्या अवतारकार्याबद्दल माजी राज्यपाल रंगराव दिवाकर यांनी म्हटले होते, ''साईबाबांच्या आत्म्याचं चराचरात व्यापून राहणं, त्या आत्म्याचा सर्वव्यापीपणा आणि निर्व्याज बालकासारखा त्यांच्या मनाचा निर्मळपणा यामुळे ते हजारो लोकांना प्रिय झाले. दु:खित-पीडितांचे कैवारी ठरले.''

'देव जो भूवरी चालिला' या चरित्रात साईबाबांच्या जीवनातील विविध घटनाचे उपलब्ध माहितीच्या आधारे साधार शब्दांकन करण्यात आले आहे. त्यामुळे साईबाबांच्या एकूणच जीवनकार्याबद्दलचे शिस्तबद्ध आकलन होते; आणि ते आकलन होत असतानाही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे गूढ अधिकाधिक गहिरेही होत जाते.

***देव जो भूवरी चालिला, पृष्ठे २६०, शंभर रुपये***

**कमान**
**विजया राज्याध्यक्ष**

**लवकरच उपलब्ध!**
मानवी नातेसंबंधांचा शोध व जाणिवांची व्यामिश्रता आणि अर्थसंपृक्त प्रतिमांची योजना यामुळे 'कमान' हा, विजया राज्याध्यक्ष यांच्या कथालेखनातील लक्षणीय कथासंग्रह ठरतो.



## चिकन, मटण, फिश आणि अंडे यांच्या देशी-परदेशी चटकदार पाककृती

# खानाखजाना

**अंजनी नरवणे**

‘प्रेमाचा मार्ग पोटातून जातो’ असे म्हणतात. नव्हे, जगभरच्या सुगरण गृहिणी ह्या सूत्राचा कळत नकळत वापर करून आपल्या कौटुंबिक साम्राज्याचा कारभार योग्य नियंत्रणाद्वारे नीटनेटका चालवतात. कुटुंबातील लहान मोठ्या सदस्यांना योग्य तो आहार आकर्षकपणे देऊन त्यांना तृप्त ठेवतात आणि त्या तृप्तीने कुटुंबातील सर्वजण आनंदाची ढेकर देतात. भोजनाच्या पद्धतीतून त्या घराची संस्कृती ठरते; आणि या संस्कृतीची जपणूक करण्याचे कार्य घरातील गृहिणीच मुख्यत्वे पार पाडत असतात.

खाद्य संस्कृतीचे प्रादेशिक आविष्कार हे त्या त्या स्थळी, त्या त्या ऋतूत उपलब्ध असणाऱ्या अन्नधान्यावर, भाज्या-फळांवर बहुतांशी अवलंबून असत. परंतु आता शीतगृहे, रेफ्रिजरेटर, वाहतुकीच्या जलद सुविधा यामुळे बहुतेक पदार्थ त्या त्या सीझन मध्येच नव्हे तर वर्षभर मिळू शकतात. त्यामुळे आपल्या खाद्यसंस्कृतीला आता आंतरराष्ट्रीय रूप येत चालले आहे. आपल्या आजच्या खाण्यात इटालियन पिझ्झा, अमेरिकन डोनटस किंवा हॅंबर्गर, आइस्क्रीम, चायनीज डिशेस, चिली सॉस, वगैरे पदार्थ सहजपणे स्थानापन्न झाले आहेत.

आजच्या गृहिणीही अशा देशोदेशींच्या नवलाईच्या चिजांचा आस्वाद आपल्या घरात घेण्याला उत्सुक दिसतात. त्यामुळे त्याबद्दल माहिती मिळवायला उत्सुक असतात. मराठीत अशी देशोदेशींच्या व विविध प्रदेशातल्या पाककृतींबद्दल मार्गदर्शन करणारी नवनवी पुस्तके मोठ्या संख्येत आकर्षकपणे प्रसिद्ध होत आहेत, हे त्याचेच एक लक्षण आहे. या मालिकेत अभिमानाने मिरवावे असे पाककृतींचे भांडार खुले करणारे ताजे करकरीत पुस्तक म्हणजे ‘खानाखजाना’. अंजनी नरवणे यांनी या पुस्तकाद्वारे देशी-परदेशी चटकदार, चमचमीत पाककृतींची खुमासदार ओळख करून दिली आहे.

चिकनच्या व्हरायटीजमध्ये राजस्थानी चिकन करी, शाही चिकन करी, हैद्राबादी



चिकन करी, उत्तर प्रदेशातील सफेत चिकन कुर्मा, हिरवा चिकन कुर्मा, जिरा चिकन मोगलाई चिकन (४ प्रकार), मेथी टिकन, चिकन धनिया, तामिळनाडूतील चेट्टिनाड चिकन करी, झांजिबार चिकन, बटर चिकन, बांगला देशी चिकन, बर्मीज चिकन करी, काश्मिरी कांगडा चिकन, गोमंतकीय चिकन सागोती, पिस्ता चिकन, पेशावरी सुके चिकन, मलई चिकन रोस्ट, फ्राइड चिकन, तंदुरी चिकन, चिकन कबाब, चिकन चॉप्स, बेसनी मुर्गी यांच्या कृती दिल्या आहेत खरे सांगायचे तर अशी नावे वाचली तरी तोंडाला पाणी सुटते. थोड्या थोड्या फरकाने चिकनचा स्वाद बदलतो; आणि प्रत्येक प्रांताने चिकनला दिलेले वेगवेगळे पारंपरिक रूप मनावर ठसते.

पुलाव व बिर्याणी करतानाही चिकन वापरले जाते. ‘सोफयानी बिर्याणी’ याची कृती राजेशाही थाटाची वाटेल.

एक चमचा केशर घातलेल्या दुधात घुसळलेले दही घ्यावे. पुदिना, कोथिंबीर, कांदा, लसूण आणि इतर मसाला पदार्थही त्यासाठी हवेत. पाणी नेहमीपेक्षा जास्त घेऊन त्याला उकळी आणून गरम मसाला घालावा, नंतर बासमती तांदूळ घालून बेताच्या गॅसवर शिजवावे. पाणी ओतून भात चाळणीवर काढून निथळू द्यावा. दुसऱ्या पातेल्यात एक वाटी तूप गरम करून त्यात चिकनचे मोठाले तुकडे मसाला-कांदा इ.सह घालून चांगले परतून, वर दही घालावे. कोमट पाणी घालून उकळी आल्यावर गॅस मंद करून त्यावर शिजू द्यावे. चिकन शिजत आल्यावर २ मोठे चमचे लिंबाचा रस घालावा. नंतर त्यावर केशर-दूध-दही यांचे दूध मिश्रण घालावे. पुदिना-कोथिंबीर घालून अर्धा भात पसरावा. वर पुन्हा केशर-दूध-दही मिश्रण टाकून उरलेला भात पसरावा. हलक्या हाताने जरा दाबून सारखा करावा. पातेल्यावर ओले फडके पसरून घट्ट झाकण कणीक लावून बंद करावे. गॅसवर तवा ठेवून त्यावर हे पातेले ठेवावे. वीसपंचवीस मिनिटे मंद गॅसवर ठेवावे. अशी ही सोफयानी बिर्याणीची कृतीदेखील मोठी कलात्मक आहे.

मटणाच्या प्रकारांचीही अशी आंतरराष्ट्रीय जत्रा ‘खानाखजाना’ मध्ये आपल्याला दिसते.

मटण करीच्या व्हरायटीत भोपाळ मटण करी, टोमॅटो मटण करी, पंजाबी मटण करी, अफगाण मटण करी, बोहरा मटण करी, वाटाणे मटण करी, दुधातील मटण करी, पांढरी मटण करी, खिमा करी, काश्मिरी कबाब करी, गावाकडची मटण करी, असे अनेक प्रकार दिसतात.

सुके मटण बनवण्याच्याही अनेक पद्धती पुस्तकात दिल्या आहेत.

बोटी कबाब, शम्मी कबाब, मटण टिक्का कबाब, काश्मिरी कबाब यांची एक वेगळीच शान असते.

मटण बिर्याणी, सिंधी पुलाव, डेगी बिर्याणी, याख्नी पुलाव, यांच्या कृतीही जिभेवर रेंगाळतील.

डेगी बिर्याणीची ही कृती पहा : मोठ्या लंगडीत तूप गरम करून, चिरलेला कांदा पसरून वर मटण पसरायचे, त्यावर भाताचा थर, वर दही असे थर एकावर एक रचत जायचे. उरलेले तूप वर टाकायचे. लंगडीवर झाकण ठेवून कडेने कणीक लावून बंद करायचे व पाच मिनिटे गॅसवर तवा ठेवून त्यावर लंगडी ठेवून, तासभर मंद गॅसवर ठेवायचे. झाली डेगी बिर्याणी तयार!

चिकन, मटण, फिश वगैरे विकत आणताना कोणती काळजी घ्यावी याबद्दल आरंभी सूचना दिल्या आहेत. त्या महत्त्वाच्या आहेत. चिकन ताजे किंवा फ्रोझन (गोठलेले) मिळते. देशी, विलायती व ब्रायलर अशा तीन जातींचे चिकन मिळते. नुसते लेग्ज किंवा ब्रेस्टही मिळते. हाडे काढून पाण्यात उकळून त्या पाण्याचे सूप करता येते.

कोरडे किंवा काळपट लाल रंगाचे मटण घेऊ नये. ते शिळे असते. ओलसर व गुलाबी, लालसर रंगाचे ताजे मटणच घ्यावे. सिंगल चॉपमध्ये मटणाचा भाग कमी येतो. म्हणून डबल चॉप्सचेच मटण घ्यावे. खिम्यात सोया ग्रॅन्युल्स मिसळले तरी चवीत फरक पडत नाही. चिकन-मटणाच्या हाडांचे सूपही पौष्टिक असते.

मासेही ताजेच घ्यावे. पिसुरडी दाबल्यावर जर लाल पाणी निघाले तर तो मासा शिळा समजावा. खवले काढताना शेपटाकडून धरून डोक्याकडे असे सुरीने तासावे. फिलेटस कापल्यावर काट्याजवळचा भाग शिजवून घेतला तर त्यात खव्यासारखा भाग निघतो.

अशा अनेक सूचनांमुळे मटण, चिकन, फिश आणि अंडे यांच्यापासून चांगल्या चवदार पाककृती होऊ शकतील. स्वयंपाकघरात 'खानाखजाना'ची प्रत जरूर ठेवा. तुमच्या सुगरणपणाला ती समर्थपणे साथ करू शकेल.

***खानाखजाना, पृष्ठे १२८, पन्नास रुपये***


लवकरच उपलब्ध!

*'कोणाला माझी गरज नाही, मी कोणाला आवडत नाही'*
अशी भावना मनात निर्माण होणं ही सर्वांत महाभयंकर व्याधी आहे.
अशी व्याधी झालेल्या रूपाच्या जीवघेण्या संघर्षाची, तीव्र वेदनांची कहाणी

अणसार

मूळ गुजराती लेखिका : **वर्षा अडालजा** अनुवाद : **अंजनी नरवणे**






## तुकड्यातुकड्यांतून उभे राहणाऱ्या अंतर्भेदक वास्तवाचा नेटकेपणाने घेतलेला शोध

# कालिंदीच्या तीरावरती

**डॉ. य. दि. फडके**

**डॉ.** य. दि. फडके यांची ओळख मुख्यतः संशोधक अभ्यासक अशी आज आपल्याला आहे. 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' हा त्यांचा प्रचंड प्रकल्प गेल्या शंभर वर्षातील घटनांच्या मूळ दस्तऐवजांच्या आधारे साकार होत आहे. शोध बाळगोपाळांचा, आगरकर, नेताजी वगैरे त्यांची पुस्तके चरित्रात्मक आहेत; परंतु त्यातही संशोधन व चिकित्सक विश्लेषण यांच्यावर भर आहे. साहित्यसंस्कृती मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काही वर्षे काम केले. एक उत्तम वक्ता म्हणूनही त्यांची ख्याती आहे. असे हे संशोधक गृहस्थ कधीकाळी कथा लिहीत होते - यावर खरे तर विश्वासच बसत नाही. परंतु त्यांच्या कथांचा 'कालिंदीच्या तीरावरती' हा संग्रहच समोर आल्यावर त्याबाबत शंका घेण्याला जागाच उरत नाही. या कथा चाळीस वर्षापूर्वी लिहिलेल्या आहेत; त्यावेळी त्या किर्लोस्कर इत्यादी मातब्बार मासिकांत प्रसिद्ध झालेल्या आहेत; आणि काही कथा तर पुरस्कारपात्रही ठरल्या आहेत. पुढे प्राध्यापक म्हणून काम करताना संशोधनाकडे त्यांनी लक्ष केंद्रित केले. त्यामुळे कथालेखन मंदावत गेले; एवढेच!

कालिंदीच्या तीरावरती, सूरसंगत, पैलतीर, मंतरलेला दिवस, पाश, कोडं, पिया मीलनकी आस, हीरो, उत्तररात्र, क्षणजीवी, अजून रात्र बाकी आहे, धग, अशा डझनभर कथा या संग्रहात आहेत. कालिंदीच्या तीरावरती ही सुमारे २६ पृष्ठांची दीर्घकथा वगळता अन्य कथांचा विस्तार आठदहा पृष्ठांपेक्षा जास्त नाही.

चाळिशीतल्या प्रसूतिशास्त्रज्ज्ञ डॉक्टर कालिंदी वर्देच्या भेटीला अशोक चौधरी हा अनोळखी तरुण येतो; तो कवी दिवाकर देशपांडे याचे चरित्र लिहिण्यासाठी साहित्याची जमवाजमव करीत असतो. त्यासाठी दिवाकरांचे नातेवाईक, मित्र स्नेही यांना भेटून, अप्रकाशित लेखन मिळवणे या मोहिमेवर तो आलेला असतो. कालिंदीला तो एक पाकिट देतो; कालिंदी

खरे म्हणजे दिवाकरची पहिली पत्नी. बॅ. वर्दे यांची कन्या. कालिंदीने दिवाकरला लिहिलेली पत्रे त्या पाकिटात असतात. ती चकित होते. वीसेक वर्षांपूर्वीची ती पत्रे असतात. दिवाकरने जपून ठेवलेली असतात. अशोकला ती पत्रे दिवाकरची पत्नी करुणा हिच्याकडून मिळतात. दहा वर्षांपूर्वीच दिवाकरचे निधन झालेले असते. ती बातमी आकाशवाणीवर ऐकल्यावर कालिंदीला एकदम चक्कर आल्यासारखे होते. त्यावेळी ती त्रिवेंद्रम येथे मिशन हॉस्पिटलमध्ये असते. कालिंदीला प्रश्न पडतो – दिवाकरशी लग्न करून त्याची पत्नी झालेली करुणा त्याला कुठे भेटली असावी? त्याचबरोबर अशोक चौधरी तिला दिवाकरच्या बालपणच्या वह्या व चित्रंही मिळाल्याचे सांगतो. पूर्वीच्या आठवणींची मनात उजळणी करीत कालिंदी भूतकाळात शिरते. दिवाकर केंब्रिजला जाऊन बॅरिस्टर होतो. आय सी एसलाही तो बसलेला असतो. लग्नानंतरच्या काळात त्याच्या कविता बदलल्या असे अशोक सांगतो. तेव्हा तिला सुखावल्यासारखे वाटते. दिवाकर हा माणूस रानटी माणसासारखा कालिंदीशी वागला असे तिची मावसबहीण सुमित्रा चौधरीला सांगते, तर तेलंग वकील दिवाकरने कालिंदीच्या वडिलांना गोड गोड बोलून फसवले असे मानतात. घरजावई होऊन सासऱ्याचा प्रचंड पैसा हस्तगत करायचा डावही त्याच्या डोक्यात घोळत असावा. असे वेगवेगळ्या व्यक्तींकडून वेगवेगळे तपशील मिळवून आलेल्या चौधरीला कालिंदी विचारते, "दिवाकरांचं सुसंगत असं चरित्र तुम्ही लिहू शकला? दिवाकरांना व्यक्ती म्हणून वाचकांसमोर उभं करू शकाल?"

दिवाकर वकील व प्राध्यापक म्हणून कसा अपेशी ठरला याची माहिती कालिंदी देते. तेव्हा तो मुंबई सोडण्याचा हेका धरतो. दिवाकर कालिंदीला दवाखाना काढण्यासाठी उत्तेजन देत नाही. शारीरिक पातळीवरही त्याचा धसमुसळेपणा चालतो. त्यातून तणाव वाढत जातो. भांडणे होत राहतात. कालिंदीवर तो हात उगारतो तेव्हा कालिंदीचे वडील त्याला ठणकावतात, "माझ्या घरात मुलीला मारहाण? शरम वाटत नाही? या घरात सरळ राहायचं असेल तर सरळ राहा. नाहीतर धक्के मारून हाकलून देईन." दिवाकर तिरीमिरीत बाहेर पडतो. परत त्याची व कालिंदीची गाठही पडत नाही.

हे सगळे ऐकल्यावर अशोक म्हणतो, "वाटायला लागलंय की हा चरित्र लिहिण्याचा उद्योग सोडून द्यावा. त्यापेक्षा दिवाकरांची कविताच पुनःपुन्हा वाचावी. त्यातले दिवाकर खरे!"

कालिंदीला प्रश्न पडतो, "दिवाकरबरोबरचे संबंध तोडून आपण काय मिळवलं? एकाकी जीवन, स्वतंत्र जीवन? मुक्तता?"

कलावंताची कलात्मक निर्मिती आणि कलावंताचे स्वभावदोष, चारित्र्य व वर्तन यातील अंतराय दाखवणारी ही कथा आजही तितकीच वास्तव वाटते. पूर्वाश्रमातील तपशील अनेकांच्या मुखातून येत राहतात; त्यातून एक व्यक्तिमत्त्व हे धूसरपणे उभे राहत राहत, शेवटी धुक्यातून एकदम बाहेर पडून लखलखीतपणे दिसू लागते. रचनेतील व आकृतिबंधातील ही



प्रयोगशील पेशकशही कथेच्या आकर्षकतेत भर टाकते.

मोगुबाई कुर्डीकर आणि केसरबाई केसकर या दोन गायिका परस्परांशी फटकून राहात. एका संगीत महोत्सवात त्यांना राजाराम हुमणे यांनी एकत्र आणले. दोघींही एकमेकींना प्रेमाने भेटल्या. बोलल्या. हा प्रसंग 'सूरसंगम' ही कथा लिहिताना य. दि. फडके यांच्या मनात असावा. या कथेतही तशीच घटना केंद्रस्थानी आहे. कथेतील गायिका जानकीबाईच्या मनात येते की राधेला भेटावं. तिच्या लेकीलाही आशीर्वाद द्यावेत. उगाच आपण राधेशी तुटकपणानं वागलो. कसले मान–अपमान आणि कसले राग–लोभ! सगळं विसरायला पाहिजे आता. किती दिवस जगणार आहोत आपण दोघी आता?" पण त्यांच्याशी काही बोलायच्या आतच राधाबाई आपल्या लेकीला (मीराला) घेऊन निघून जातात. कन्या मीरा आईला (राधाबाईला) म्हणते की मला त्यांचं गाणं ऐकायचं आहे. पण तिला थांबू न देता राधाबाई म्हणतात, "कशाला थांबायचं? आज जानकी आली होती ती आपली फजिती बघायला. ती माझं गाणं कधी ऐकायची नाही. मी गायला बसणार म्हटले की उठून जायची... तिची नजर तुझ्यावर पडलीच आहे. घरी गेल्यावर मीठमोहऱ्या ओवाळून टाकते."

दोन कलावंत आपापल्या मनातले रागद्वेष जोपासत राहतात. जवळ येण्याची इच्छा त्यापुढे दुबळी ठरते.

शिरीनचा प्रियकर आशुतोष विमान अपघातात मरण पावतो. शिरीनला किती धक्का बसला असेल असा प्रश्न कथालेखक डॉ. जोशी तिचा मित्र जगदीश याला विचारतो. जगदीश उत्तर देतो, "तुला काय वाटतं? जन्मभर आता आसवं ढाळीत, उसासे टाकीत, कोमेजल्या चेहऱ्याने जगणार आहे का शिरीन?... ही तापलेली, पेटलेली पोरगी काही दिवसांतच कुणाच्या तरी गळ्यात पडेल...चैनीत जगेल... तू या बायकांना काय ओळखलं आहेस अजून? नुसती पुस्तकं वाचून तुला नाही कळायचं हे. त्याला आयुष्य जगलं पाहिजे."

कथालेखक त्यावर एक गोष्ट लिहितो. तिच्यातील तरुणी मार्था नाचून झाल्यावर जोडीदाराला आपल्या मृत पतीबद्दल म्हणते – "तू काही म्हण राजू, मी त्याला विसरू शकत नाही." याच क्षणी जगदीश त्याजकडे येतो. कथा वाचतो आणि 'तू मला चक्क व्हिलन बनवलंस" असं सांगून तो वस्तुस्थिती सांगतो की गळ्यात पडू पाहणाऱ्या शिरीनला जगदीशच धारेवर धरतो. शिरीन जाते. तो गोष्ट लिहितो. ती प्रसिद्ध होते. नंतर स्वतः शिरीन जुहूला काय झाले ते कथालेखकाला सांगते. "जगदीशच्या – पुरुषाच्या स्पर्शासाठी मी आसुसलेली होते... थकव्यानं मला ग्लानी आली. जाग येते तेव्हा शेजारी झोपलेल्या जगदीशकडे पाहून आशुतोषची आठवण होते. जगदीशला ती तसे सांगते तेव्हा जगदीशचा तोल जातो. तो आशुतोषबद्दल अद्वातद्वा बोलतो. ती म्हणते, "मी हे तुम्हाला सांगणार नव्हते. पण तुमची कथा वाचली. जगदीश बायकांबद्दल बोलतो ते खरं आहे. पण फरक एवढाच की तुम्ही बायकांविषयी नुसतेच

वाचले आहे, ऐकले आहे. तर जगदीशने बायका नुसत्या खेळवल्या आहेत. जगदीशला सांगा, मी त्याची चौकशी करीत होते."

कथेतली पात्रं अशी चौकटीत न राहता जिवंत होऊन बंदिस्त चौकट मोडून सरळ चालायला लागतात आणि कथेची खिळखिळी झालेली चौकट तेवढी उरते, असे कथालेखक म्हणतो. कथा लिहूच नयेत असेही ठरवतो. पण पुन्हा एखादा मंतरलेला दिवस येतो. कथा लिहितो.

–डॉ. य. दि. फडके यांच्या कथांमध्ये मानवी स्वभावातल्या व नात्यांमधल्या अशा विसंगतीचे, वेगळेपणाचे, अनपेक्षित वर्तनाचे नमुने दिसतात. माणसे आपल्या वर्तनाचे जे काही स्पष्टीकरण देतात त्यातही त्यांच्या मानसिकतेचे प्रतिबिंब पडलेले असते. कथा सरळ कधी ते सांगत नाहीत; वेगवेगळ्या व्यक्तींच्या व घटनांच्या मालिकेतून, आंतरक्रियेतून वास्तवाचा एकेक तुकडा ते जुळवत निघतात. जिगसॉसारखे ठोकळे जुळवून ते कथा पूर्ण करतात. त्यांच्या कथा म्हणजे संशोधनाचाच एक वेगळा आविष्कार वा प्रकार ठरतो. संशोधनकार्यात गुंतल्यामुळे एक चांगला कथाकार हरवला – याची हळहळ वाटावी असा हा कथासंग्रह आहे.

***कालिंदीच्या तीरावरती, पृष्ठे १३२, पंच्याहत्तर रुपये***


# रोदँ




**शांताराम पारपिल्लेवार**

उत्कटतेनं रसरसलेला, आग्रही, बुद्धीनं प्रगल्भ असला, तरी तरल संवेदनशक्तीच्याच बळावर कृती करणारा मनस्वी शिल्पकार. त्यानं आपलं समग्र व्यक्तिमत्त्व जणू स्वत: घडवलेल्या शिल्पाकारांत ओतून दिलं ! युगप्रवर्तक फ्रेंच शिल्पकाराची मनोवेधक चरितकहाणी - रोदँ!

किंमत : **दोनशेनव्वद रुपये**




**कितीही विसंगती व अडचणी असोत, एकविसावे शतक भारताचेच असणार!**

## भारत : नेहरूंपासून नंदनवनापर्यंत

**शशी थरूर**
**अनु.: मधुकर तोरडमल**

'भारत : नेहरूंपासून नंदनवनापर्यंत' हा तीनशे पृष्ठांचा ग्रंथ म्हणजे स्वातंत्र्योत्तर पन्नास वर्षांचा एक चलच्चित्रपट आहे. एक कल्पित आणि एक कल्पना, दोन हत्या आणि एक शवयात्रा, एकता–विविधता आणि अन्य विसंगती (दुधाच्या चमत्कारापासून ते मल्याळी चमत्कारापर्यंत), अनुसूचित जाती : अननुसूचित बदल, भारतीय आणि भारतातले अल्पसंख्याक, अनिवासी भारतीय, हिंदू उत्पादनवाढीचे प्रमाण, स्वातंत्र्य नसले तरी चालेल, पोटभर भाकर मात्र हवी, भारत – वय वर्षे ४९, भविष्यातील वाटचाल–नंदनवनाच्या दिशेने अशा दहा प्रकरणात भारतीय संस्कृतीच्या दुखऱ्या जागांचा शोध लेखकाने घेतला आहे. 'भारत हा एक भौगोलिक आकृतिबंध आहे, विषुववृत्ताला ज्याप्रमाणे एकसंध देश म्हणता येणार नाही त्याप्रमाणे भारतालाही एकसंध देश म्हणता येणार नाही' हे सर विन्स्टन चर्चिल यांचे विधान आरंभीच उद्धृत करून लेखक शशी थरूर "अंतर्गत विरोधांपेक्षाही भारत अधिक काहीतरी आहे" याकडे लक्ष वेधतात. भिन्न प्रांत, सतरा भाषा, असंख्य बोलीभाषा, ९८ कोटी लोकसंख्येचा हा देश या देशाचा विचार कसा करावा असा प्रश्न लेखकाला पडतो. "भारतीय संस्कृतीने चार प्रमुख धर्मांना जन्म दिला, शास्त्रीय नृत्याची बारा घराणी दिली, पंचाऐंशी राजकीय पक्ष निर्माण केले, बटाट्याचे खाद्यपदार्थ करण्याचे तीनशे प्रकार शोधून काढले, त्या देशाच्या भविष्याचे तर सोडाच, वर्तमानाचे चित्र तरी कसे रंगवणार?" असाही प्रश्न लेखक उपस्थित करतो.

भारताबद्दल कोणताही सिद्धान्त मांडला तर तो लगेच खोडता येईल असा दुसरा सिद्धान्तही लगेच सापडेल असे शशी थरूर म्हणतात. सत्यमेव जयते – सत्याचा जय होईल हे भारतीय राजमुद्रेवरचे घोषवाक्य. पण लेखक विचारतो, "पण हे सत्य कुणाचे?"९८ कोटी

लोक येथे आहेत; म्हणून या प्रश्नाची ९८ कोटी उत्तरे संभवतील. भारताबद्दल अनेकवचनात बोलावे लागते. ज्याचा त्याचा भारत अलग आहे. इथे अनेक समूह, अनेक धर्म, अनेक चालीरीती, अनेक तत्त्वज्ञाने आपआपले अस्तित्व टिकवून आहेत.

भारत हा अनेक विसंगतींनी भरलेला देश आहे. हिंदू संस्कृती, इस्लाम व ख्रिस्ती धर्मांचा प्रभाव आणि दीडशे वर्षांचा इंग्रजांचा अंमल – या सर्वांचा परिणाम झालेला येथे दिसतो. – हा भारत एकसंध कसा राहिला याचेच कोडे अनेकांना सतावत राहते. लेखक ह्या सगळ्या विसंगतीचा निर्देश करून म्हणतो – भारताबद्दल पटण्यासारखे एकच विधान करता येईल. ''भारतातील कोणतीही गोष्ट गृहीत धरता येणार नाही.''

भारत हा भौगोलिक विस्ताराच्या दृष्टीने जगातला सातव्या क्रमांकाचा देश आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने दुसऱ्या क्रमांकाचा. भारताची किनारपट्टी ३५३३ मैलांची आणि सीमा ९४२५ मैलांची आहे. काश्मीर ते कन्याकुमारी दक्षिणोत्तर लांबी २०००मैल लांबी आणि तेवढीच रुंदी.

–असे अनेक तपशील देऊन आपला मुद्दा पटवण्याची लेखकाची हातोटी असामान्य आहे.

पहिल्या प्रकरणात स्वातंत्र्याची कहाणी सांगताना महात्मा गांधींच्या योगदानाची चर्चा शशी थरूर यांनी केलेली आहे. गांधीवादाच्या मर्यादा उघड झालेल्या असल्या तरी गांधींचे मोठेपण नाकारता येत नाही असे थरूर म्हणतात. गांधींचे सत्य हे मूलतः त्यांचे स्वतःचे सत्य होते.

दुसऱ्या प्रकरणात नेहरू घराण्याचा भारतीय राजकारणावरचा प्रभाव विचारात घेण्यात आला आहे. लोकशाही राज्यव्यवस्था, समाजवादी अर्थव्यवस्था, धर्मनिरपेक्षता आणि अलिप्ततावादी परराष्ट्र धोरण हे नेहरूंच्या वारशाचे चार स्तंभ होते.

''माझ्याजवळ कोणतेही राजकीय तत्त्वज्ञान नाही, माझा कोणत्याही इझमवर विश्वास आहे असे मला वाटत नाही.'' असे इंदिरा गांधी म्हणत असत. राजीव गांधींनी मुत्सद्देगिरीपेक्षा राजकीय डावपेच खेळण्यात जास्त रस घेतला, देशहितापेक्षा स्वतःच्या हिताकडेच जास्त लक्ष दिले असे लेखकाचे मत आहे. आणीबाणीच्या काळात शशी थरूर यांच्या एका लघुकथेवर बंदी घालण्यात आली. भारतात येण्याची परवानगीही नाकारण्यात आली. त्यांना राजीव गांधींबद्दल मात्र आदर व आत्मीयता आहे. राजीव गांधींनी पंजाबला पुन्हा लोकशाही प्रक्रियेत आणले. त्यांच्या अंतःप्रेरणा चुकीच्या आहेत असा आरडाओरडा होताच ते प्रतिकार न करता माघार घेऊन मोकळे झाले म्हणून लेखक त्यांना दोष देतो.

गांधी घराण्याशी केवळ वैवाहिक संबंधाने जोडल्या गेलेल्या एक इटालियन स्त्रीला भारताच्या पंतप्रधानपदावर बसवण्याची शक्यता निर्माण करणारी जादू नेमकी कशात आहे



असा प्रश्न लेखक विचारतो.

नेहरू–गांधी घराण्याला म्हणावा तसा पर्याय नाही; त्यामुळे गांधी घराण्याचा वारसा सांगणाऱ्या कुणीतरी नेतृत्व हाती घेतले तर अगतिक काँग्रेसला पुनरुज्जीवन लाभेल अशी निष्ठावंत काँग्रेसजनांची भावना आहे हे लेखकाने १९९६ साली लिहिलेल्या या पुस्तकात स्पष्ट म्हटले आहे.

१९९२मध्ये बाबरी मशीद पाडण्यात आली. त्यानंतर लेखकाने भारताचा दौरा केला. त्यावेळी त्याला दुःख झाले. ''माझ्या हिंदुत्वाचा मला गर्व आहे. पण माझा धर्म मला धर्मांधांच्या हाती द्यायचा नाही. धर्मभेद मानणे, अन्य धर्मीयांवर हल्ला करणे, त्यांना मारणे, त्यांची धर्मस्थाने उद्ध्वस्त करणे – हा कुविचार माझ्या धर्मात बसत नाही. हिंदुत्वाला धर्मांध हिंदुत्ववाद्यांच्या कचाट्यातून सोडवण्याची हीच वेळ आहे'' असे लेखक म्हणतो. ''आपण भारतीय स्वभावतः निधर्मी वृत्तीचे नाही, आपल्या दैनंदिन जीवनात धर्माला महत्त्वाचे स्थान आहे. सर्वधर्मसमभाव मात्र येथे हवा.'' अशी लेखकाची भावना आहे.

भारताचे नंदनवन होईल असे लेखकाला वाटते. त्यासाठी तरुणवर्गाला तो आवाहन करतो. बाहेरच्या जगाच्या पराक्रमाकडे व उत्पादनाकडे निकोप निर्भय दृष्टीने पाहणे, विविधतेतील एकात्मता जोपासणे, देशाची निर्मितिक्षमता व समृद्धी वाढवणे, ही भारताच्या युवाशक्तीची जबाबदारी आहे; याचे स्मरण देऊन एकविसावे शतक हे भारताचे असेल असा ठाम विश्वासही प्रकट करतो.

भारतीय विविधता व विसंगती यातून आपणास बाहेर काढून आपला स्वाभिमान आणि पराक्रम यांना आवाहन करणारा हा ग्रंथ प्रत्येक सुजाण व्यक्तीने काळजीपूर्वक वाचायला हवा.

***भारत : नेहरूंपासून नंदनवनापर्यंत, पृष्ठे ३१२, दोनशे रुपये***


'मूल' असेल, तरच
'आई-बाप' असणं,
आणि 'मूल' गेलं, तर
'आई-बाप' नसणं?
जीवनातील ही
जीवघेणी सापेक्षता
मांडणारी हृदयद्रावक
कादंबरी

**मूल**

**संजोग वीरकर**

किंमत
**नव्वद रुपये**



## जून १९९८ – 'पुस्तकांची नावे सांगा' स्पर्धेचा निकाल

१) आपल्याला न आवडणारा, न झेपणारा, न जमणारा अभ्यासक्रम घरच्या व वडीलधाऱ्यांच्या आग्रहाखातर निवडून नंतर पस्तावत बसणे इष्ट नाही.
पुस्तक : **व्यवसाय मार्गदर्शक**

२) फाळणीची पार्श्वभूमी या कादंबरीला आहे.
पुस्तक : **फेरा**

३) आम्ही निष्पाप आहोत. पण आम्ही काही करू शकत नाही. असहाय्य आहोत.
पुस्तक : **झ्लाटाज् डायरी**

या स्पर्धेत बरोबर उत्तरे पाठवणाऱ्यांपैकी पुढील स्पर्धक भाग्यवान ठरले आहेत. त्यांचे अभिनंदन. त्यांनी आपल्या आवडीची रु. १००ची पुस्तके कळवावी.

१) **प्रा. अण्णा भोसले,** ज्ञानोपासक महाविद्यालय, पत्रपेटी क्र. ५४, परभणी–४३१४०१.

२) **विकास विष्णुपंत वाघ,** मु.पो. नायगांव, व्हाया मुरुड, ४१३५१० ता. कळंब, जि. उस्मानाबाद.

३) **रामकृष्ण शिवराम लिंगायत,** मु.पो. देगाव, ४१५७११ ता. दापोली, जि. रत्नागिरी.

# नवीन स्पर्धा

### पुस्तकरूपाने प्रत्येकी १०० रुपयांची पाच बक्षीसे

यावेळची स्पर्धा म्हटले तर अगदी सोपी आहे. मराठी ग्रंथजगतचे अंक तुम्ही किती काळजीपूर्वक जपून ठेवता यावर या स्पर्धेतील यश अवलंबून आहे. गेल्या पाचसहा महिन्यात मराठी ग्रंथजगतच्या अंकात आलेल्या पुस्तकपरिचयांबरोबर त्या त्या पुस्तकांची मुखपृष्ठे छापलेली आहेत. खाली दिलेल्या चौकोनात योग्य त्या पुस्तकाचे मुखपृष्ठ कापून चिकटवायचे आहे; आणि हे पूर्ण पृष्ठ त्या पुस्तकांच्या चिकटवलेल्या चित्रासह पाठवायचे आहे. बरोबर पाठवणाऱ्यांपैकी लॉट टाकून पाच जणांना पुरस्कार दिले जातील. लागा मग तयारीला!
**मुदत – २० सप्टेंबर १९९८.**

*आमचा पत्ता :* **मेहता मराठी ग्रंथजगत,** मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ, पेरूगेटाजवळ, पुणे – ४११०३०.



## मुखपृष्ठे शोधा : बक्षीस मिळवा

**काचवेल**
आनंद यादव

**तंतू**
अनु. उमा कुलकर्णी

**बोटभर टॉम**
शीला काकडे

**पृथ्वीवर माणूस उपराच**
सुरेशचंद्र नाडकर्णी

**तुटलेला पतंग**
म. वि. कोल्हटकर

**स्पर्धकाचे नाव** ________________________

पूर्ण पत्ता ________________________

________________________

________________ पिनकोड नंबर ________

# फुले आणि काटे

## सिनेमा म्हणजे काय?

सिनेमा म्हणजे काय? उत्तर तसं सोपं नाही. मला मात्र ते एका छोट्या मुलानं लिहिलेल्या निबंधात सापडलं होतं. जपानचे ख्यातनाम कादंबरीकार शिगा नेओचा यांनी उत्कृष्ट गद्य वाङ्मय म्हणून आपल्या नातवाने लिहिलेला हा 'माझा कुत्रा' नामक निबंध एका मासिकात छापला होता. त्यात हा छोटा निबंधकार म्हणतो, 'माझा कुत्रा अस्वलासारखा दिसतो, तो कोल्ह्यासारखा दिसतो, तो लांडग्यासारखा देखील दिसतो–' असं करत त्या मुलाने जंगलातल्या तमाम प्राण्यांची नावे घेऊन त्या प्रत्येकासारखा आपला कुत्रा दिसतो असं लिहून शेवटच्या ओळीत म्हटलं होतं' – 'पण अखेर तो कुत्रा असल्याने कुत्र्यासारखाच दिसतो.'

मी जेव्हा प्रथम हा निबंध वाचला तेव्हा मोठ्याने हसलो होतो. परंतु माझं हसू ओसरताना एक गोष्ट माझ्या लक्षात आलं की यात एक मुद्दा आहेच. सिनेमा तमाम पारंपरिक कलांसारखा दिसतो. त्याला वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व आहे. त्यात नाटक आहे, तत्त्वज्ञान आहे, शिल्पकला, चित्रकला, संगीत असं सारं सारं आहे. परंतु तरीही तो शेवटी फक्त सिनेमाच आहे.

**–कुरोसावा** (जपानी दिग्दर्शक)

## चित्रपट : कादंबरीपेक्षा भिन्न

तुम्हाला जर चित्रपटासाठी पटकथा लिहायची असेल तर तुम्ही आधी जागतिक दर्जाच्या कादंबऱ्या आणि नाटकं यांचा अभ्यास केला पाहिजे. ते वाचत असताना तुम्हाला जाणवणारे भाव कुठून येतात, लेखकाची उत्कटता काय प्रकारची आहे, व्यक्तिरेखा आणि प्रसंग प्रभावीपणे उभे करण्यासाठी बारीकसारीक तपशीलाचा वापर लेखकाने कसा केला आहे या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी अगदी तन्मयतेने तुम्ही वाचन केले पाहिजे. जेणे करून सर्वांगाने तुम्हाला त्या कलाकृतीचं आकलन होईल. तुम्ही श्रेष्ठ दर्जाचे अभिजात चित्रपट पाहिले पाहिजेत. थोर दिग्दर्शकांचा चित्रणविषयक दृष्टिकोण समजून घेतला पाहिजे.

दिग्दर्शक व्हायचं हे जर तुमचं ध्येय असेल तर तुम्ही पटकथा लेखनात कमालीचं कौशल्य प्राप्त केलं पाहिजे. चांगली पटकथा घेऊन चांगला दिग्दर्शक उत्तम कलाकृती निर्माण करू शकतो. त्याच पटकथेवरून सामान्य दर्जाचा दिग्दर्शक बऱ्यापैकी चित्रपट करू



शकतो. परंतु वाईट पटकथेवरून प्रतिभावंत दिग्दर्शक देखील चांगला चित्रपट नाही बनवू शकत. श्रेष्ठ दर्जाच्या सिनेमाटिक अभिव्यक्तीसाठी कॅमेरा (दृक) आणि मायक्रोफोन (श्राव्य) यांचा सुरेख मेळ जुळून यावा लागतो. आणि हे घडवून आणण्याची ताकद पटकथेत असते.

सुरुवातीला मी एकटाच माझी पटकथा लिहीत असे. परंतु लवकरच मी अन्य दोन सहकारी लेखकांच्या सहाय्याने पटकथा लिहू लागलो. एकच माणूस जेव्हा पटकथा लिहितो तेव्हा त्यात कथेची एका बाजू येते. तुम्ही जेव्हा आणखी दोन लेखक मदतीला घेता तेव्हा त्याच कथेच्या तुम्हाला एकूण तीन बाजू गवसतात. तुम्हाला न पटलेल्या मुद्द्यांवरून चर्चा करता येते. त्यातून आणखीही बरेच काही, आधी न जाणवलेलं हाती लागतं. कथा अधिकाधिक फुलते. सर्वांगाने 'दिसू' लागते. एकाच लेखकाने पटकथा लिहिल्यामुळे येणारं आविष्कारातलं एकारलेपण टाळता येतं. उत्तम चित्रपट करायचा तर ते आवश्यक असते.

**–कुरोसावा** (जपानी दिग्दर्शक)

## कादंबरीचे नाट्यरूपांतरण

नाट्यरूपांतरणांचा धावता आढावा घेतल्यास असे लक्षात येते की, प्रामुख्याने लोकप्रिय कादंबऱ्यांचीच नाट्यरूपांतरणे होत असतात. लोकप्रिय कादंबऱ्यांच्या यशामुळे प्रेक्षकांविषयी अंदाज करणे सोपे असते. लेखकाला यशाची खात्री वाटते. दुसरे म्हणजे एखाद्या नवख्या नाट्यरूपांतरकर्त्याच्या नाटकातील त्रुटित जागा, प्रेक्षक मूळ कादंबरी माहीत असल्याने मनातल्या मनात पूर्ण करीत जातात. हे नाट्यरूपांतरणाला दोषास्पद आहे. ही नाटके कच्ची असतात. नाटककारास यामुळे प्रसिद्धीच्या झोतात लौकर येता येत असले तरी अशा नाट्य रूपांतरांचे प्रयोग दीर्घकाळ चालत नाहीत. फार थोडे नाटककार कलात्मक कादंबऱ्यांची नाट्यरूपांतरणे मोठ्या जिद्दीने करीत असतात. मूळ कादंबरीतील आव्हान देणारी, कच्ची सामग्री यामागे असते. मूळ कादंबरीतील सूक्ष्म निरीक्षण, तपशीलवार व्यक्तिरेखाटन, स्वाभाविक संवाद, वास्तव चित्रण, या सामग्रीची उत्तम नाट्यरूपांतरणास नेहमीच मदत होते. एखादा कुशल नाटककार जाणकार दिग्दर्शकाच्या मदतीने आपली नाट्यरूपांतरणे अधिक सामर्थ्यशाली करीत असतो. या दृष्टीने विजया मेहता यांच्यासारख्या जाणकार दिग्दर्शकामुळे माध्यमविषयक समृद्ध जोड लाभल्याचा स्वानुभव जयवंत दळवी यांनी व्यक्त केला आहे. मूळ कादंबरीतील सूचकता, प्रतीकात्मकता, तपशीलवार चित्रण, नाट्यरूपांतरणाच्या यशाला मदत करते असे सत्यजित रे यांनीही मान्य केले आहे.

**–कल्पना कामत** (मराठी कादंबऱ्यांची नाट्यरूपांतरणे,
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ३४ या पुस्तकातून पृष्ठ १४)

### व्यक्तिरेखांच्या क्रियाप्रतिक्रिया

एखाद्या चांगल्या वाङ्मयकृतीतील व्यक्तिरेखा कधीही एकटी नसते. ती प्रथम एक कुटुंबघटक म्हणून आणि नंतर एक समाजघटक म्हणून आपणासमोर वावरते. या तत्त्वानुसार जयवंत दळवी यांची पात्रे एकमेकांशी जोडलेली असतात. गौण पात्रेदेखील आपल्या विशिष्ट क्रियाप्रतिक्रियांनी मूळ अनुभवाशी जोडलेली असतात. व्यक्ती व समाज यांतील ताण त्यांच्या कादंबऱ्यांत व नाटकात समर्थपणे व्यक्त होतात. व्यक्तीव्यक्तींतील नातेसंबंध, व्यक्तिरेखांचे अनुभव व त्यांच्या भोवतालची परिस्थिती या सर्व क्रियाप्रतिक्रियांतून मूळ कादंबरीतील अनुभव नाटकात अधिक व्यामिश्रतेने गोचर करण्यात येतो.

**–कल्पना कामत** (मराठी कादंबऱ्यांची नाट्यरूपांतरणे, पृष्ठ ३६४)

### नाट्यरूपांतरण झालेल्या आधारभूत कादंबऱ्या

१. हरिभाऊ आपटे – पण लक्षात कोण घेतो?, रूपनगरची राजकन्या, वज्राघात, उषःकाल
२. वि. स. खांडेकर – ययाती, अमृतवेल
३. नाथमाधव – देशमुखवाडी, सावळ्या तांडेल
४. मामा वरेरकर – चिमणी, धावता धोटा
५. सानेगुरुजी – श्यामची आई
६. पु. भा. भावे – अकुलिता
७. मधु मंगेश कर्णिक – देवकी, सूर्यफूल
८. चिं. त्र्यं. खानोलकर – अगोचर
९. श्री. ज. जोशी – आनंदी गोपाळ
१०. जयवंत दळवी – महानंदा, अंधाराच्या पारंब्या, अथांग, सावल्या
११. गो. नी. दांडेकर – शितू
१२. श्री. ना. पेंडसे – रथचक्र, हद्दपार, गारंबीचा बापू, लव्हाळी
१३. ना. सी. फडके – अखेरचे बंड
१४. शं. ना. नवरे – संवाद, सुरुंग
१५. ज्योत्स्ना देवधर – कल्याणी
१६. अनिरुद्ध पुनर्वसू – मी हरिणी मीच व्याध
१७. अनिल बर्वे – थँक यू मिस्टर ग्लाड
१८. व्यंकटेश माडगूळकर – बनगरवाडी
१९. वसंत वरखेडकर – सत्तावनचा सेनानी



२०. मनोहर शहाणे – पुत्र
२१. वि. वा. शिरवाडकर – जान्हवी
२२. शिवाजी सावंत – मृत्युंजय
२३. अरुण साधू – बहिष्कृत
२४. त्र्यं. वि. सरदेशमुख – बखर एका राजाची
२५. दि. बा. मोकाशी – देव चालले
२६. ग. ल. ठोकळ – गावगुंड

### सूफी संतांची ग्रंथसंपदा

सूफ म्हणजे लोकर व लोकरीची वस्त्रे परिधान करणारे म्हणजे सूफी. सूफी संतांच्या तत्त्वज्ञानावर वैदिक व बौद्ध विचारांचा प्रभाव आहे. भजन, कीर्तन प्रभा, गरीबीत राहून ईश्वराची आळवणी करणे हे सूफी पंथात प्रचलित आहे. सूफी पंथात अल्लाह हा स्त्री आहे; तर भक्त हा पुरुष आहे. हा मधुरा भक्तीचा अनोखा आविष्कार इस्लामला मान्य नाही. इ. स. १२४०मध्ये इब्न अरबी या संताने सूफी पंथाची संहिता संकलित केली. त्यात अस्तित्वदर्शी अद्वैत आहे. आचारात अनुताप (तौबा), सहनशीलता, भिक्षापात्र स्वीकृती, अल्लाहची मर्जी सर्वश्रेष्ठ मानण्याची वृत्ती यांचा उल्लेख आहे. इराणात पतंजलीच्या योगसूत्रांचा प्रभाव होता. त्यातून सूफींनी कुंडलिनी, परमतत्त्वाशी मीलन व आराधना पद्धत यांचा स्वीकार केला. पश्चिम अशियात बौद्धमताच्या प्राबल्यामुळे मठ, विहार वगैरेंचा स्वीकार केला. या पंथात राबिया, अबू हाशिम, अबू याजीद, अबू सुलेमान, उमरखय्याम, सादी, मोइउद्दिन चिश्ती, बहाउद्दीन, जाकारिया, भख्तयार यासारखे संत होऊन गेले. भारतात हा प्रेमसाधनेचा, मधुरा भक्तीचा पंथ गणला गेला. ईश्वराला प्रेयसी मानून तिची आर्त आळवणी करणाऱ्या अनेक रचना केल्या गेल्या. कुतुबा मृगावती, जायसी पद्मावत, उस्मानचे चित्रावती यांचा उल्लेख या संदर्भात करता येईल. कबीर, दादू, दरिया यांच्या काव्यावर सूफी विचारांचा परिणाम स्पष्ट दिसतो.

**–संजीवनी खेर** (धर्म, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पृष्ठ ९२)

*विविध विषयावरील उत्तम मराठी पुस्तकांसाठी अवश्य भेट द्या.*

**आयडियल पुस्तक त्रिवेणी**

छबिलदास रोड, दादर (पश्चिम), मुंबई - २८. फोन - ४३०२१२६

## नवीन पुस्तके - नवीन लेखक

### जोड्या जुळवा

पुढे काही नवीन पुस्तकांची नावे दिली आहेत. त्यांच्या लेखकांची नावे कळवा आणि बक्षीस मिळवा.

१) **मूल** (कादंबरी)
२) **चितेवरच्या कळ्या** (कादंबरी)
३) **रंग सुखाचे** (लेख)
४) **कालिंदीच्या तीरावरती** (कथा)
५) **रोदँ** (कादंबरी)

*लेखकांची नावे :*

**वसंत गायकवाड, बा. ग. केसकर, संजोग वीरकर, डॉ. रमा मराठे, शांताराम पारपिल्लेवार, शिरीष पै, य. दि. फडके, शिवाजी सावंत, शान्ता शेळके**

उत्तर कार्डावर पाठवा. मुदत - **२० सप्टेंबर १९९८.** यशस्वी स्पर्धकांपैकी तिघांना लॉट टाकून बक्षीसे. प्रत्येकी १०० रुपयांची पुस्तके.

*आमचा पत्ता :* **मेहता मराठी ग्रंथजगत,** मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ, पेरूगेटाजवळ, पुणे - ४११०३०.


## पालकांसाठी खुषखबर!

*खास मुलांसाठी आम्ही **एक आकर्षक सवलत योजना** जाहीर करीत आहोत. आपण मे महिन्यापासून १० महिने दरमहा २० रु. पाठवा. आपल्या मुलांसाठी पुढील मे महिन्यात ३०० रुपयांची आपल्या पसंतीची पुस्तके आम्ही आमच्या खर्चाने पाठवू. त्वरा करा. या योजनेचे सभासद व्हा व मुलांसाठी मे महिन्यात छान छान भरपूर पुस्तके घरपोच मिळवा.*

*आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.*




## जून अंकातील स्पर्धेचा निकाल

### शब्दकोडे क्र. ५चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भं | गा | र | ■ | शु | द्ध | म | ती | ■ | वा | ळू | क |
| क | व | ■ | खा | क | ■ | ती | र्थ | क्षे | त्र | ■ | था |
| स | रा | ई | त | ■ | का | ■ | ■ | म | ट | की | ■ |
| ■ | न | श्व | र | ■ | ट | क | ला | ■ | ■ | र | ज |
| ता | ■ | र | ज | नी | क | र | ■ | प | र | वा | ना |
| व | ट | ■ | मा | ज | ■ | व | सा | ■ | ग | ■ | न |
| दा | न | व | ■ | ■ | का | त | क | री | ■ | शा | खा |
| न | ■ | हि | र | व | ळ | ■ | व | त | न | ■ | ना |

या स्पर्धेत पुढील भाग्यवंत उमेदवार बक्षीसपात्र ठरले आहेत.
त्यांनी प्रत्येकी शंभर रुपयांची पुस्तके कळवावी.


१) **विनेश मारुती लाळगे,** मु.पो. लोणीमावळा, ४१४३०७ ता. पारनेर, जि. अहमदनगर.
२) **ऋत्विक सावंत,** ई/८२, मोहननगर, डहाणूकरवाडी, कांदिवली (प), मुंबई-४०००६७.
३) **सातापा पुंडलिक कांबळे,** सदाशिवराव मंडलीक महाविद्यालय मुरगूड, ता. कागल, जि. कोल्हापूर.


शाळा, महाविद्यालयं, ग्रंथालयं आणि साहित्यप्रेमींना खूषखबर!
अनेक विषयांवरील मराठी पुस्तकं मनमोकळ्या वातावरणात
तासन् तास मनसोक्त पाहण्यासाठी आणि खरेदी करण्यासाठी
**कोल्हापूरमधील एकमेव ठिकाण**

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर ४१६०१२.
फोन : ५२२३०४ टेलिफॅक्स : ५२१८८१

# ग्रंथजगत शब्दकोडे सोडवा, बक्षीस मिळवा!



**ग्रंथजगत**
**शब्दकोडे : ६**

रचनाकार : श्रीविजय

वरील चौकानात बरोबर उत्तरे भरून दि. **२० सप्टेंबर १९९८** पर्यंत पाठवा. बरोबर उत्तरे पाठवणाऱ्यांपैकी (लॉट टाकून येणाऱ्या) पहिल्या तीन स्पर्धकांना प्रत्येकी १०० रु.ची पुस्तके बक्षीस.

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत**, १२१६, सदाशिव, पुणे–४११०३०.

**आडवे शब्द :**

१. राजीव गांधी यांच्या पुस्तकाचा मराठी अनुवाद
२. सुनंदा देशपांडे यांचे अनुवादित बालवाङ्मय
६. अनुराधा पोतदार यांचे वडील वि. द. × ×
७. रणजित देसाई यांनी लिहिलेली शेवटची कादंबरी
९. वि. स. खांडेकरांचा लघुनिबंध संग्रह हि×××
१०. आत्मचरित्र लिहिणारी एक मराठी अभिनेत्री सीमा ××

**उभे शब्द :**

१. विज्ञानविषयक लेखन करणारे एक साहित्यिक
३. 'प्रवाहातील पक्षी' या पुस्तकाची लेखिका ×× गव्हाणकर
४. लीला भागवत यांचे एक पुस्तक
५. वि. स. खांडेकरांच्या रूपककथांचा संग्रह वन×××
८. टी. जी. राघव यांचे अनुपमा डंबळ यांनी अनुवादित केलेले पुस्तक



# वाचकांचा प्रतिसाद

जून १९९८च्या वाचनीय अंकाबद्दल धन्यवाद. आपल्या 'संपादकीय' मधील 'वाचनालयातील अभिजनांचे अड्डे' ही कल्पना आवडली. वाङ्मयीन वातावरण निर्माण करून टिकविण्यात अभिजनांचे अड्डे उपयुक्त ठरतील असे वाटते.

**–डॉ. रमेश जोशी, दादर, मुंबई.**

संपूर्ण साहित्याच्या घडामोडी आपण आपल्या मेहता मराठी ग्रंथजगतमध्ये देता. त्यामुळे कळते की साहित्य विश्वात काय काय होत आहे. मी दर महिन्याला आपल्या अंकाची अगदी आतुरतेने वाट पाहत असतो. अंक एकदा हातात आला की पूर्ण वाचल्याशिवाय तो सोडतच नाही. मला आपला मार्चचा साहित्य विशेषांक खूप आवडला. आपण असेच विशेषांक पुढेही काढत रहावे ही नम्र विनंती. आपण आपल्या अंकात स्वाक्षरी संदेश म्हणून एक सदर ठेवावे. त्यात मान्यवर लेखकांचा साहित्यविषयक संदेश आणि बरोबर त्यांची स्वाक्षरी छापावी. साहित्य वार्ता हे सदर खूप आवडते.

**–अनिल अहिरे, ओझर टाऊनशिप, नाशिक**

जुलै १९९८च्या अंकातील 'मला जाणवलेली तसलिमा' हा मृणालिनी गडकरी यांचा लेख खूप आवडला. पुस्तक परिचय हे सदर फार आवडते. पुस्तकाचा नेमका गाभा सांगणारी ही छोटेखानी परीक्षणे उपयुक्त आहेत. पुस्तक वाचावे, विकत घ्यावे असे वाटायला लावणारी आहेत. 'फुले आणि काटे' मध्ये शंकर सारडा यांनी 'व्यक्तिपरीक्षणातील उथळपणा' अचूकपणे दाखवून दिला आहे. तो पटला. त्यामागील श्री. सारडा यांचा दृष्टिकोन व्यापक स्वरूपाचा आहे. कलेच्या आकलनासाठी कलावंताचेही आकलन होणे आवश्यक आहे. वस्तुनिष्ठ व्यक्तिपरीक्षणाची त्यामुळेच गरज भासते. एकूणच अंक आवडला.

**–प्रा. मेधा सिधये, पुणे**

शाळा, महाविद्यालयं, ग्रंथालये आणि साहित्यप्रेमींना खूषखबर.
अनेक विषयांवरील मराठी पुस्तकं मनमोकळ्या वातावरणात तासन् तास मनसोक्त पाहाण्यासाठी आणि खरेदी करण्यसाठी मुंबईतील एकमेव ठिकाण
**मॅजेस्टिक एजन्सीज्**
छबिलदास रोड, दादर (पश्चिम), मुंबई - २८. फोन - ४३०२१२६

## काही विज्ञानविषयक पुस्तके

**छंदातून विज्ञान**
डी.एस्. इटोकर

**जनुक शक्ती**
आशिष दत्त/सुधा भट्टाचार्य

**प्रयोग करूया गमतीचे**
कुलकर्णी/भागवत/गंभीर

**माहितीचे महामार्ग**
के. डी. पावटे

**एकविसावं शतक**
निरंजन घाटे

**यंत्रमानव आणि कृत्रिम बुद्धिमत्ता**
निरंजन घाटे

अधिक माहितीसाठी लिहा : **मेहता पब्लिशिंग हाऊस,**
१२१६, सदाशिव, पुणे–४११०३०.

## काही उत्कृष्ट अनुवाद

**आंधळ्याचे डोळे**
अनु.: शान्ता शेळके

**अनुभव : बासू भट्टाचार्य**
शब्दांकन : अशोक राणे

**बीज**
अनु.: शैला सायनाकर

**निमित्तानिमित्ताने**
अनु.: शान्ता शेळके

**सागरतीरी**
अनु.: अंजनी नरवणे

**फ्रीडम ॲट मिडनाईट**
अनु.: माधव मोर्डेकर